

# आबा महाजन विशेषांक

मासिक

# शिक्षणयात्री


वर्ष: ७ वे

फेब्रुवारी २०२२

अंक: २ रा

किंमत: ४० रूपये

# प्रकाशित पुस्तके



**बालकवितासंग्रह**
- गमतीच्या राज्यात, २००१, गमभन,पुणे
- रिमझिम गाणी, २००५, वीणा प्रकाशन
- लई मज्जा रे, २००८, दिलीपराज प्रकाशन,पुणे
- बिस्किटचा बंगला,२००९, दिलीपराज प्रकाशन, पुणे

**शिशुगीत संग्रह**
- मौजमजा,२००३, वीणा प्रकाशन

**विनोदी बालकवितासंग्रह**
- चिऊचा मोबाईल,२००७, सुरभी प्रकाशन,औरंगाबाद
- वाघोबाची गांधीगिरी, २००७, ऋचा प्रकाशन,नागपूर

**द्वैभाषिक चार ओळींचा बालकवितासंग्रह**
- गंमतीदार खेळांचा खजिना, २००८,साकेत प्रकाशन,औरंगाबाद

**किशोर/कुमारांसाठी कवितासंग्रह**
- हिप हिप हुर्रे, २०१५, दिलीपराज प्रकाशन,पुणे
- खानदेशी गाव,२०१९, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर
- ठोंब्या गेला मंगळावर, २०२१, दिलीपराज प्रकाशन,पुणे

**अहिराणी बोलीभाषेतील बालकवितासंग्रह**
- मन्हा मामाना गावले जाऊ,२०१३,अथर्व पब्लिकेशन्स (महाराष्ट्रातील पहिला अहिराणी बाल कविता संग्रह)
- मन्हा गावले, २०१६,दिलीपराज प्रकाशन,पुणे

**बालकुमार कादंबरी**
- ठोंब्या, २०१५, दिलीपराज प्रकाशन,पुणे

**बालकुमार कथासंग्रह**
- टांगाटोली ,२००८,दिलीपराज प्रकाशन,पुणे
- शेखचिल्लीची फूल टू धम्माल,२०११, दिलीपराज प्रकाशन, पुणे
- आबाची गोष्ट २०१७, दिलीपराज प्रकाशन,पुणे

**चित्रकथा**
- ठोंब्या, टकलू अंकल आणि इतर कथा, २०२०, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

**अनुवाद**
- आनंदेरो झाड,२०१९,दिलीपराज प्रकाशन,पुणे (शालेय विद्यार्थ्यांनी बंजारा बोलीत केलेला अनुवाद)

**हिंदी**
- चिडिया का मोबाईल,२०२१,इसाप प्रकाशन ,नांदेड.

**इंग्रजी**
- To My Village २०१९,दिलीपराज प्रकाशन,पुणे (मन्हा गावले या अहिराणी काव्यसंग्रहाचा जितेंद्र कुवर यांनी केलेला अनुवाद)

**पोस्टर कविता**
- शाळा। बाप। लेक। घर। आई। शिक्षक। शेतकरी राजा (अथर्व पब्लिकेशन्स,जळगांव)
- ग्रंथमहिमा (प्रतिमा पब्लिकेशन्स,पुणे)

**फ्रेम कविता**
- मुलांनो ...,२०१८,गमभन,पुणे
- प्रिय पोरा,२०१६,मंथन फाऊंडेशन, जळगांव

**कॉफी मग**
- मुलांसाठी व रसिकांसाठी कॉफी मग,२०१८,गमभन,पुणे

**ध्वनिफीत**
- शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी मुंबई निर्मित ध्वनिफीत
- रागिणी म्युझिकतर्फे बालगीतांच्या ध्वनिफीती

**बालनाट्य**
- ऑपरेशन भोंदू बाबा (आकाशवाणी केंद्र,जळगाव)

**सहभाग**
- साहित्य अकादमीच्या विजयवाडा (आंध्रप्रदेश) येथील राष्ट्रीय सेमिनारमध्ये बालकवितेचे वाचन
- प्रयोगशील बालसाहित्याचे मूल्यमापन या विषयावर साहित्य अकादमीच्या मुंबई येथील परिसंवादात सहभाग
- साहित्य अकादमी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी बालसाहित्य ' या विषयावर बीजभाषण

**पीएच.डी./प्रबंध लेखन**
- आबा गोविंदा महाजन यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर तृषार वडगावकर यांचे पीएच.डी.साठी संशोधन कार्य सुरू
- आबा महाजन यांची बालकविता या विषयावर विनोद सिनकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे पीएच.डी.कोर्सवर्कसाठी शोधनिबंध सादर

संवाद



*सुभाष कुलकर्णी*
*संपादक*

माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। -संत ज्ञानेश्वर
पुष्पा माझी पुष्प मोगरी। परि मला माझी कस्तुरी ।।
तैसी भाषा माझी साजरी। भाषा मराठी ।।

बहिणाबाईपासून आधुनिक कवीपर्यंत साऱ्यांनीच मराठी भाषेची थोरवी आपल्या शब्द शक्तीनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी भाषेचा साज,सौंदर्य त्या त्या काळातील साहित्यिकांनी फुलवण्याचा प्रयत्न केला आहे. आणि मराठी भोषेने सुध्दा या साऱ्या साहित्य सेवेकरींना ममत्वेने आपल्या कवेत घेतले आहे.त्यांची सेवा रुजू करुन धेतली आहे.मराठी भाषा दिना निमित्त अशाच एका साहित्य सेवेकरीची सेवा महाराष्ट्र शासनाने,वाचकांनी रुजू करुन घेतली ते महाराष्ट्रातील बालसाहित्यिक आबा महाजन ज्यांचा गेल्या वर्षीच साहित्य अकादमी पुरस्काराने गौरव करण्यात आला. त्यांचा विशेषांक करण्याची कल्पना अनेक साहित्य प्रेमींनी बोलून दाखविली म्हणून हा अंक आबा महाजन विशेषांक म्हणून सादर करीत आहोत.

आबा महाजन हे स्वनिर्मित,स्वप्रेरणेने साहित्य क्षेत्रात उदयाला आले.कधी काळी बाबासाहेब आंबेकडरांनी सार्वजनिक दिव्या खाली अभ्यास केल्याचा इतिहास आजही प्रेरणा देणारा आहे.त्या प्रेरणेने अनेक महापुरुष,साहित्यिक, समाजसेवक,राजकारणी घडले.त्यातलेच आबा महाजन एक आहेत.कधी काळी डोक्यावर भाजी विकणारा,दुसऱ्यांची गुरं चालणारा हा कवी मनाचा माणूस आपल्या साहित्याने इतका परिचित होईल हे त्याला बालपणी पाहणाऱ्यांना सुध्दा न पटणारे आहे.

मला दोन लोकांचे नेहमी नवल वाटत आले आहे. एक बालरोगतज्ञ आणि एक बालकवी! बालरोगतज्ञा कडे येणारं लहान बाळ त्यांची व्यथा स्वत: सांगू शकत नाही. पण पालकांनी सांगितलेली लक्षणे आणि बालकाचा स्पर्श बालरोगतज्ञाला अचूक निदान करायला मदत करते.तद्वत बालकवी हा मुलांच्या मनात प्रवेश करुन त्यांच्या गप्पा गोष्टी,कथा-व्यथा आपल्या साहित्यांतून मांडत असतो.आणि त्या कथा कविता बालकांसोबत प्रौढांच्याही मनाला वेड लावणाऱ्या ठरतात.अशा सर्वांचा मनाला वेड लावणाऱ्या कथा,कविता निर्मितीचे श्रेय आबा महाजनांना आहे.प्रशासकीय कागदांच्या ढिगाऱ्यात राहून सुध्दा आपले कवी मन ताजे तवाने ठेवणाऱ्या आबा महाजनांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

# अंतरंग


**बोली भाषेची राणी-अहिराणी**
ना.धो.महानोर / ३

**कठीण परिस्थितीतून मार्ग काढायला शिकवणाऱ्या कथा**
बबन शिंदे/ ४

**मन्हा गावले: अहिराणी बोलीतील वाचनीय बालकविता**
प्रा.डॉ.तुषार चांदवडकर / ६

**बालसमीक्षकांचा पहिला प्रयोग**
फारुक काझी/ ८

**मन्हा गावले: बोलीतील काव्यनिर्मितीचा आश्वासक प्रयोग**
डॉ.योगिता पाटील / १०

**मंत्रमुग्ध करणारा आबा महाजन यांचा बिस्किटचा बंगला**
अशोक कोतवाल / १५

**आबा महाजन यांच्या बालसाहित्याचा प्रवास....**
डॉ.फुला बागूल/ १७

**ठोंब्या गेला मंगळावर**
उमेश मोहिते/ १९

**सालदाराचा मुलगा ते साहित्य अकादमी पुरस्कार विजेता**
सुधाकर जाधव / २०

**विशिष्ट वर्गीय मानसिकता त्यागातच मराठीचे भले**
विलास देशपांडे/ २१

**नवे वर्ष,नवे आयाम,नवे परिमाण..**
डॉ.विजय पांढरीपांडे/ २३

**झिरो बजेट-मुंबई दर्शन सहल!**
अरुण पाटील/२६

**यशाची एकेक पायरी चढतांना.**
किशोर माळी/२८

**उपक्रमांनी लावला शाळेचा लळा!**
युवराज माने/३०

**छोटासा आर्मा**
डॉ.नंदा हरम/३४



**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक **शिक्षणयात्री**

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥

वर्ष : ७ वे अंक: २ रा फेब्रुवारी २०२२

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-**
**त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री
क्रांतीनगर मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी

उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार

अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ
अमोल महाजन जळगांव
जयदिप पाटील जळगांव

कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

**प्रतिनिधी सहाय्य**
**पुणे-** रमेश काळे,
**मुंबई-** जयपाल गिरासे,
**नाशिक-**किरण पाटील,
**सोलापूर-** उमेश काळे,
**औरंगाबाद-** रवि गारूडकर,
**परभणी-** युवराज माने,
**जळगांव-** प्रविण माळी,
**नंदुरबार-** तुकाराम धनगर,
**अमरावती-** रूपेश माने,
**कोल्हापूर -** गुलाब बिसेन,
**सातारा -** विनोद भोजने,
**बीड -** अनंत दिक्षित,
**लातूर -** पंढरीनाथ चिभडे,



**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

# बोली भाषेची राणी-अहिराणी

ना.धों.महानोर
पळसखेड

खानदेशात खानदेशी बोली व अहिराणी बोली या दोन मुख्य मराठी बोलीभाषा आजही सर्वत्र आहेत. स्व. दा. गो. बोरसे यांनी अहिराणी भाषेचं मोठे लेखन व संपादन केलेलं आहे. गुजराती भाषेची जवळीक व लहयजा असलेली अहिराणी बोली आजही खानदेशाच्या सगळ्याच लोकजीवनात छान नांदते आहे.

सण, उत्सवाची, विवाह समारंभाची व सगळ्यात जीवनाचा तळ शोधणारी कित्येकांच्या तोंडची लोककविता...... गोष्टी छान वाटतात. ‘ पळसखेडची गाणी’ या माझ्या लोकगीतसंग्रहात काही कविता संदर्भ आहेत.

‘ जयगाव सहयरना पाव्हना ऊना
त्याहिले काहीनाही समजसवो माय
लाडूपेडा काहीनाही समजत
कांदाबटाटा म्हणतस वो माय’

आबा महाजन हे खान्देशातील प्रसिद्ध बालसाहित्यिक. मुलांसाठी ते सातततत्याने सकस लिहिताय. त्यांच्या कथा-कविता पाठ्यपुस्तकात- अभ्यासक्रमात आहेत. महसूल विभागात मोठ्या पदावर कार्यरत असतांनाही त्यांनी लहान मुलांशी साहित्यातून नातं जपलंय हे विशेष.

आबा महाजन यांनी त्यांच्या अहिराणी कविता व त्यासोबतच भाषांतरीत केलेल्या मराठी बोलीतल्या सर्व कविता छान आहेत. अहिराणीतून मराठी बोलीत केलेलं भाषांतर खूप मेहनतीनं व काळजीपूर्वक केलेलं आहे. भाषा-भाषांतर, त्यातील शब्दांच वैभव- शब्दकळा हे या निमित्ताने नव्यांन समोर येतं. भारतीय भाषांमधलं साहित्य भाषांतर याची गरज आज जाणवते ते बऱ्याचपैकी चाललं आहे. तरीही यासारखेही प्रयोग व्हावेत आणि त्यानंतर त्यावर चर्चा होऊन पुढे अधिक काही अहिराणी व अनेक बोलीभाषांचं करता येईल.

आबा महाजन यांनी खूप चांगल्या बालकविता/बालसाहित्य लिहिलंय. त्यांच स्वागतही झालं. त्यांच्या या बालसाहित्यातील अहिराणी प्रयोगाला व एकूण लिखाणाला, धडपडीसाठी हार्दीक शुभेच्छा!

# कठीण परिस्थितीतून मार्ग काढायला शिकवणाऱ्या कथा

बबन शिंदे
कळमनुरी जि.हिंगोली

आबा महाजन हे नाव मराठी बालकुमार वाचकांना नवे नाही. गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून त्यांच्या दर्जेदार लेखणीमुळे ते सर्वदूर परिचित आहेत. त्यांच्या कथा-कविता अनेक मासिकांतून बालवाचकांना वाचायला मिळतात. नुकताच त्यांचा नवाकोरा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. तो म्हणजे 'आबाची गोष्ट'. या कथासंग्रहात असे नाव दिले आहे. या कथेत आबा महाजन यांनी आपल्या शालेय जीवनातील प्रसंग अतिशय व्यवस्थितपणे मांडला आहे. मुळात प्राथमिक शिक्षक असणारे आबा महाजन जिद्द, चिकाटी व खडतर मेहनतीच्या जोरावर महसूल खात्यात अधिकारी झाले आहेत.

एकदा जिल्हाधिकारी साहेबांच्या कार्यालयात मिटींगला जात असताना नांद्रा गावाच्या फाट्याजवळ बोरं विकणाऱ्या मुलाकडे त्यांची नजर गेली. गाडी थांबवून त्यांनी त्या शाळकरी मुलाकडून बोरं विकत घेतली. चालत्या गाडीत बोरं खाताना त्यांना त्यांच्या बालपणी त्यांनी नथ्थुमियाच्या यात्रेत बोरं विकून स्कॉलरशिपचे पुस्तक विकत आणल्याचा प्रसंग आठवला. स्कॉलरशिपचं पुस्तक स्वकष्टाने आणले खरे, पण शाळा व शेतकामाच्या व्यापातून वेळ मिळत नसल्याने त्यांनी गुरे राखत अभ्यास केला. अनेकदा गुरे चंपाशेटच्या बांधावर जायची. शेट रागावायचे. पुस्तक वाचून कुठे मामलेदार होणार आहेस? असे खोचक बोलायचे. तरीपण लेखक न खचता अभ्यासात मग्न होत असत. सततच्या जागरणामुळे एकदा त्यांची तब्येत बिघडली असल्याचे त्यांनी कथेत नमूद केले आहे. अंगात ताप भरला असतानाही त्यांनी स्कॉलरशिपची परीक्षा दिली. त्यात त्यांना यश आले नाही. राणे सरांनी त्यांना धीर दिला. भविष्यात मोठा अधिकारी होशील असा विश्वास व्यक्त केला. राणे सरांचे बोल खरे ठरले. या कथेतून त्यांनी स्वत:च्या आयुष्यातील एक प्रसंग सांगून बालकुमार वाचकांना संदेश दिला आहे. परिस्थितीला न डगमगता तोंड दिल पाहिजे. अपयश आल्यास खचून न जाता धैर्याने तोंड दिले संकटाला घाबरून आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचा प्रयत्न कथाकराने केला आहे आणि त्यात ते पूर्णपणे यशस्वी झाले आहेत.

'दोस्ती राम रहिमची' या कथेतून त्यांनी जातीयतेला मूठमाती देवून संकटाच्या वेळी जो धावून येतो तोच खरा मित्र असतो हे दाखवून दिले आहे. चुगलखोर माणसावर विश्वास न ठेवता वस्तुस्थिती जाणून घेण्याचा मोलाचा संदेश दिला आहे. 'गुरं ढोरं आणि पुस्तकं' या कथेतून त्यांनी केले स्वत:च्या उदाहरणातून हे सिध्द केले आहे. आवड असली की सवड मिळतेच. कारण कथाकाराने स्वत:च्या उदाहरणातून हे सिध्द करून दाखविले आहे. शालेय जीवनात घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे शेतात गुरं राखूनही त्यांनी वर्गात पहिला दुसरा नंबर कायम टिकवून ठेवला होता. शेवटी कष्टाच्या बळावर आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होवून साहेब बनून दाखवले. हुशार, कष्टाळू माणसे

हातावर विश्वास ठेवूनच नेत्रदिपक यश मिळवितात असे दाखवून दिले आहे.

मनकरणाबाईचा नातू' ही कथा वाचकाला खिळवून ठेवते. स्वत:चा मुलगा जन्मदात्या आईला कसा फसवतो. घरदार सर्व विकून आईला रेल्वे स्टेशनवर सोडून पत्नी व मुलाला घेऊन पोबारा करतो. या कथेतून समाजात वाढत असलेल्या अपप्रवृत्तीचे दर्शन घडते. 'दिनूची कमाल' या कथेतून दिनूने संकटात मदतीचा हात पुढे करावा. जीवावर बेतलेल्या संकटातून सोडवण्याचा उपदेश केला आहे. 'बोलका वर्ग' या कथेत कथाकाराला जेव्हा शिक्षक म्हणून छोट्या खेड्यात नोकरी मिळाली तेव्हा त्यांनी मोठ्या धाडसाने सर्व खेडेगाव बदलून टाकलं. 'केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहीजे' याचं उत्तम उदाहरण होय. सुरूवातीला नकोशी वाटणारी शाळा आता स्वत:ला हवीहवीशी वाटत होती. प्रतिकुल परिस्थितीवर मात करण्यासाठी तनमनधनाने राबले की,अनुकूल परिस्थिती निर्माण करता येते हे सिद्ध करून दाखविले आहे. 'गारपीठ' ही कथा ऐन सुगीत गारपीट झाल्यावर कास्तकाराचे किती हाल होतात, हाती आलेला घास गळून पडावा तशी त्याच्या मनाची अवस्था होते. निसर्गाच्या लहरीपणाचे गंभीर परिणाम शेतकऱ्याला कसे सहन करावे लागतात ह्याचे हुबेहुब चित्र साकारले आहे.

'कचेरी' या कथेत उत्पन्नाचा, जातीचा व कोणताही दाखला काढण्यासाठी कारकून असे सतावतात. तलाठी सर्व कागदपत्रे एकदाच न सांगता एक एक सांगून चकरा मारायला लावतात. चिरीमिरी देणाराला कागदपत्रांची पूर्तता पूर्ण न करताच ताबडतोब काम करून देतात. साध्या सरळ माणसाला हेलपाटेमारायला लावतात. साधा कोतवालही त्यात कमी नसतो. त्याची अरेरावीची भाषा हे अगदी तंतोतंत कथेत मांडले आहे. शेवटी ती व्यक्ती त्रासिक मुद्रेने कसा भडकतो हे कथाकाराने अतिशय पद्धतशीर मांडले आहे. 'गफूरभाई रिक्षावाला' ही कथा गफूरच्या प्रामाणिकपणा दाखवून देते. एका शिक्षकाचे पाच लाख पंचवीस हजार रूपये एवढी रक्कम तो परत करतो. ती बातमी वर्तमानपत्रात झळकते. गफूरचा प्रामाणिक स्वभाव पाहून डॉक्टर सकीनाचे बील घेत नाही. सकीना ही गफूरमियाची पत्नी अतिदक्षता विभागात असताना तो सरळ रक्कम परत करण्याला प्राधान्य देतो.

'आबाची गोष्ट' यातील सर्व कथा वाचनिय आहेत. खेड्यातील माणसांच्या जगण्यासंदर्भातील आहेत. कथा स्वानुभावांवर आधारित आहेत. भाषा सरळ, साधी, सोपी व रसाळ आहे. आशय, विषय, मांडणी उत्तम आहे. काही कथेत अहिराणी भाषा वापरल्यामुळे अधिक जिवंतपणा वाटतो. कथेत ग्रामीण भागातील जीवन चित्रीत केले आहे. कथा बालकुमारांना परिस्थितीचा जाणीव करून देऊन प्रेरणाही देतात. बालकुमारांचे भावविश्‍व, संस्कार व उपदेश कथांतून ठळकपणे जाणवते. कथा आत्मपर असल्या तरी त्यात पाल्हाळ नाही. कथा वाचकांना नक्कीच आवडतील. मुखपृष्ठ व आतील रेखाटने पुस्तकेचे वाङ्:मयीन मूल्य वाढवणारे आहेत. छपाई व बांधणी उत्तम आहे. कथेचे आशय विषय मांडणी चांगली आहे. कथेत लेखकाचे निवेदन जास्त आहे. कथेतील पात्रे फारसे संवाद साधत नाहीत. कथा स्वानुभावावर आधारित आहेत.

# मन्हा गावले: अहिराणी बोलीतील वाचनीय बालकविता

प्रा.डॉ.तुषार चांदवडकर
नाशिक

अहिराणी ही मराठीतील एक महत्त्वपूर्ण बोली आहे. बोलीभाषा या टिकल्या पाहिजेत, असे नुसते बोलून शक्य नाही. तर यासाठी काही प्रयोगशील कृतीही करणे गरजेचे आहे. आबा महाजन-मराठीतील अलीकडच्या काळातील महत्त्वाचे बालसाहित्यिक आहेत. मोठ्या प्रमाणात बालसाहित्य निर्माण करणारे श्री. महाजन जळगाव (खानदेश) येथील रहिवासी असून, महसूल सेवेत ते प्रशासकीय अधिकारी आहेत. नुकताच त्यांचा अहिराणी बोलीतील 'मन्हा गावले' हा बालकवितासंग्रह पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाने प्रसिद्ध केला. प्रत्येक मुलाने वाचावा असा हा काव्यसंग्रह आहे. कारण यात अहिराणी बोलीतून खानदेशातील सण, संस्कृती, दैवते, नातीगोती सुरेख शब्दांत मांडले आहे.

//खानदेशी देवता-दैवतं वा सण-संस्कृती//

खानदेशात कानबाई या लोकदेवतेच्या पूजा 'रोट' नैवेद्याने केली जाते. या दैवतावरील पहिलीच कविता बघा...

**खानदेशनी माय**
**कानबाई सजनी**
**झिम्मा फुगड्या**
**मिरवनूक निंघनी (पृ.क्र.६)**

या कमी शब्दांत कानबाईची वैशिष्टये कवीने सुलभ शब्दांत मांडली आहेत. आखाजी (अक्षयतृतीया) असाच महत्त्वाचा सण. वैशाखातील या सणाला मुलं मामाकडे आईसोबत आजोळी येतात. धूम करतात.

**शायले लागनी सुट्टी, पाटीपुस्तकले आते बुट्टी आखाजीले मामाना गावले जाऊ, तिठे निमले झोका खेऊ मामाकडे खापरावरली पुरणपोळी-आंब्याचा रस खाऊ**(पृ.क्र.२०)

मामीच्या हातच्या सांजोऱ्या खाऊ, मामाच्या पोरांसोबत धूम करू, हरवलेल्या गावाचे हे भावबंध भावविभारे आहेत. 'गरराई' (गौराई) देवीवरील ही कविताही खानदेशातील अक्षयतृतीयेच्या काळातील देवी वैशिष्ट्ये सूचित करते. इथे माहेरी आलेल्या मुलीचे मन या कवितेतून मोकळे केले आहे.

**माहेरी आलेल्या सासुरवाशिणीची ही देवी....**
**डोकावर गवराई धरसू वं माय, डोकावर गवराई धरसू**
**मन्ही आखाजी उनी वं माय, मन्ही आखाजी उनी**
(पृ.क्र २१)

या काळात या मुली-लेकी कडुलिंबाला झोके बांधतात. फुगड्या खेळतात, रस-पोळीचा नैवेद्य दाखवितात. डोक्यावर गौराई नेऊन नदीत विसर्जित करतात. हा सगळा सोहळा या सासुरवाशिणीच्या मुखातून उभा केला जातो. पित्तरपाटा म्हणजे पितृपक्ष. मृतात्म्यांना नैवेद्य दाखवून श्रद्धांजली अर्पण करण्याची ही महत्त्वपूर्ण प्रथाही यातून येते. हा छोटा मुलगा आपण आज्याला (आजोबा) पहिले नाही. मात्र, त्यांच्या जुन्या फोटोवरून तो कसा

दिसायचा?, हे गंमतीदार शब्दांतून उभा करतो.

**आजाले माले काई, देखता नई उनं**
**तसना मांडीवर बशीसन, खेयता नई उनं**
**टकलं होतं पडेल, मुच्छी अनुकुचीदार**
**काया कोट घालीसन,**
**कसा दिसतच रूबाबदार** (पृ.क्र.२३)

'गुलाबाई' या भाद्रपद महिन्यातील मुलींच्या लाडक्या दैवतीचे कवीने छान ओळख करून दिली आहे.

**भादरपदना महिनामा, गुलाबाई बसस**
**पानंफुलसनी माय, चौरंग सजस** (पृ.क्र. ४४)

मग घरोघरी होणारी गाणी, खाऊ ओळखण्याची गंमत या सर्व निरागस बालपणाला इथे सजवले आहे.

//व्यक्तिचित्रे//

या विविध व्यक्तिचित्रेही आहेत. जसे 'धल्डा मधून..

**एक शे धल्डा, रोज वावयात जास**
**बागेबागे चालीसन, चारीमेन्ड फिरस** (पृ.क्र. २२)

किंवा 'बुटबैंगन' (बुटका) मध्ये गोट्या खेळणारा टिल्लू, तसेच 'सुकडूराव' मध्ये बारक्या सुकडूवरील अनुप्रासादात्मक

**सुकडूराव सुकडराव, काय राव खातस भाव**
**शाकभाकर खातस नई, खातस इतुकसा नुस्ता पाव**
(पृ.क्र. २२)

कविता किंवा आळशी ठोम्या, धल्ली, आकाबाई, धुडक्या, खनबूट, बायडी, सुपडाबोय ही व्यक्तिचित्रे अस्सल खानदेशी आहेत. खानदेश, बहिणाबाई यातून मुलांना अस्सल खानदेश महिमा कळतो. मित्रांनो, आपल्या मुलांना आपल्या प्रथा-परंपरा, खानदेशी संस्कृती कळवण्यासाठी नक्कीच 'मन्हा गावले' वाचायला द्या, यात वाचनानंदासोबत समाधानही मिळेल. भाषा-बोली अशाच तर टिकतील, नाही का?


## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये   द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये   त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

With pay any app

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

# बालसमीक्षकांचा पहिला प्रयोग

प्रौढ साहित्यांच्या तुलनेत  असल्यामुळेच कदाचित मराठी बालसाहित्य समीक्षेचे फारसे प्रयोग झाले नाहीत. मात्र प्रा. विद्या सुर्वे-धोरसे यांनी 'बालसाहित्य आकलन आणि समीक्षा' या पुस्तकात एक चे वेगळा प्रयोग करून पाहिला आहे. मुलांना समजेल, आवडेल आणि मुख्य म्हणजे त्यांना वाचंनासाठी प्रेरित करेल.

असा हा भन्नाट प्रयोग आहे.

फारुक काझी
सोलापूर

मराठी बालसाहित्यात साहित्य निर्मिती सातत्याने जरी होत असली तरी क्षेत्रात काही प्रयोग सोडले तर साहित्य समीक्षा फारशी झालेली नाही. कादाचित बालसाहित्यात अजून प्रौढ साहित्याच्या तुलनेत कमी लेखन झाले असल्याने असेल. असे प्रयत्न फारसे आढळत नाहीत. लीलावती भागवत. भारत सासणे, विश्वास वसेकर, मंदा खांडगे इ. साहित्यिकांनी बालसाहित्य समीक्षेत आपलं योगदान दिलं आहे. मुलांसाठी समीक्षा म्हणून प्रा. विद्या सुर्वे-बोरसे यांनी 'बालसाहित्य: आकलन आणि समीक्षा' या पुस्तकात एक वेगळा प्रयोग करून पाहिला आहे. मुलांना समजेल, आवडेल व वाचनासाठी प्रेरित करेल, असा प्रयत्न त्यांनी केला.

बालसाहित्याची समीक्षा त्यांचे वाचक असलेल्या मुलांनीच केली तर?असं म्हटलं तर मुलं कथा कविता लिहिताहेत हे ठीक; पण समीक्षा हा त्यांचा प्रांत नाही. असं काहींच मत असू शकतं. मुळात समीक्षा याचा अर्थच विशिष्ट साहित्यकृतीच्या गुण-दोपांची चर्चा करणारे लेखन. महाराष्ट्रात नुकताच असा प्रयत्न झाला आहे.

बुलडाण्याच्या भारत विद्यालयात शिकणाऱ्या इयत्ता सातवीतील मैत्री लांजेवार हिने आपल्या मैत्रिणींच्या सोबतीने म्हणून तिला सांगोला येथे झालेल्या चौथ्या विद्यार्थी साहित्य संमेलनात राज्यस्तरीय पुरस्कारही मिळाला आहे. 'आबा गोविंदा महाजन-बालसाहित्य आकलन आणि परिचय' या नावाने हे पुस्तक, अथर्व पब्लिकेशन, जळगाव' यांनी प्रकाशित केले आहे. आबा गोविंदा महाजन सातत्याने मुलांसाठी विविध त्यांचे काही कवितांसग्रह, दोन कथासंग्रह, ठोंब्या ही बालकांदबरी, आणि काही पोस्टर कवितांची समीक्षा यात केली आहे. समीक्षा करणारा गट हा साधारण इयत्ता सहावी ते नववीच्या दरम्यानचा आहे. पुस्तके वाचून त्यावर मुलींनी (सर्व समीक्षक मुली आहेत.) जे वाटंत ते अगदी स्पष्ट, सहज सोप्या भाषेत मांडलं आहे. वाचक जेव्हा समीक्षा करतो तेव्हा त्यात कदाचित समीक्षाकाकडे असतो तो तटस्थ भाव, ती चिकित्सक दृष्टी नसेलही; परंतु त्यामुळे त्यांच्या मताला न्यूनत्व येत नाही. असे प्रयोग सातत्याने व्हायला हवेत. यातूनच वाचकांची भक्कम फळी तयार होईल.

आबा महाजन यांचं साहित्य मुलींना खूप आवडलं, हे त्यांच्या लेखनातून दिसून येतं. तसेच त्यांनी काही बदलही सुचवले आहेत. ऋचा टाकळकर 'बिस्किटचा बंगला' या कवितासंग्रहाविषयी लिहिताना म्हणते, 'यात माझ्या

आवडीच्या विषयावर कविता दिसल्या नाहीत, यातली चित्रे रंगीत हवी होती,' 'घर' या पोस्टर कवितेवर प्रीती तवर खूप मार्मिक अन् अभ्यासू मत मांडते. तनया कुळकर्णी हिने 'मन्हा गावले' या पुस्तकाची समीक्षा खानदेशी भाषेत केली आहे. त्यातील शेवटचा परिच्छेद प्रमाण मराठीत का, असा प्रश्न पडतो. हा निश्चित एक आशादायी प्रयत्न आहे. अलविना शेख 'हिप हिप हुर्रे' पुस्तकाबाबत लिहिते की, या संग्रहाची किंमत कमी असायला हवी होती. म्हणजे तो सहज विकत घेऊन आपल्या घरी ठेवता आला असता. 'ही अपेक्षा खूप मार्मिक आहे. पालक सर्व खर्चात कुठेही मुलांसाठीच्या पुस्तकांची-मासिकांची तजबीज नाहीत. चांगली व स्वस्त पुस्तकं उपलब्ध होत नाहीत, ही एक मोठी शोकांतिका आहे.

संपादकीय-मैत्री लांजेवार, ठोंब्या-ऋचा पुराणिक, लई मज्जा रे उतरा गवई, वाघोबाची गांधीगिरी-विशाखा नरवाडे, मन्हा मामाना गावले जाऊ-दिशा कोलते, बिस्किटचा बंगला-ऋचा टाकळकर, टांगाटोली-समीक्षा गवते. गमतीच्या राज्यात-श्रेया भुसारी, हिप हिप हुर्रे-अलविना शेख, शेखचिल्लीची फुल२ धम्माल-जान्हवी गोरे, मन्हा गावले-तनया कुळकर्णी, चिऊचा मोबाईल-श्रेया खर्चे, शिक्षक-मुक्ती उचाडे, घर-प्रीती तवर, लेक-यशश्री जवरे, प्रिय धोरा-वैष्णवी चव्हाण, बाप-अबोली भोकरे या वाचकांनी आबा गोविंदा महाजन यांच्या कथा, कादंबरी, कविता या साहित्य प्रकाराची समीक्षा केली आहे. एखाद्या साहित्यिकाच्या साहित्याची निवड करून त्यावर काही मुली एकत्र येऊन समीक्षा लिहितात. ही कल्पनाच नाविन्याने नटलेली व तितकीच तयारीचीही आहे. यामागील प्रेरणा असलेल्या नरेंद्र लांजेवार यांचा उल्लेख करावाच लागेल. मैत्री व तिच्या मैत्रिणी यांनी केलेला हा प्रयत्न निश्चित कौतुकास्पद आहे.

# मन्हा गावले:
# बोलीतील काव्यनिर्मितीचा आश्वासक प्रयोग

डॉ.योगिता पाटील
धुळे

**अर्थात या सर्व मला वैयक्तिक जाणवलेल्या मर्यादा पण, 'गवराई' 'सरावन झाड', 'गुलाबाई', आम्हनं घर, 'पोया', 'कानबाई' सारख्या कविता अस्खलीत अहिराणी बोलीतला बाज दिमाखाने मिरवणाऱ्या कविता आहेत. तर, 'सपना मझार', 'सपनमा उना साप', 'सांग ना वो माडी', 'शायले सुट्टी' या बालकविता अहिराणी बालकवितेच्या प्रांगणातील आरंभ पाऊल ठरावे अशाच आहेत. त्या वाचल्यानंतर ''अहिराणी भाषेतील नामशेष होऊ पाहणारे अनेक शब्द जतन करणारा हा कवितासंग्रह खरोखरच अहिराणी बोलीचा भाषिक ठेवा सृमद्ध करणारा असाच आहे.'' कवीच्या या मताशी नि:संशयपणे सहमत व्हावेच लागते.**

जागतिकीकरणाच्या झंझावातात खान्देशातील अहिराणी बोली 'लोकभाषा' म्हणून आपले स्थान टिकवून आहे. सांस्कृतिक संक्रमण, लवचिकता या भाषिक वैशिष्ट्यांनुसार इंग्रजी या भाषेचा संकर अहिराणी बोलीलाही झालेली दिसून येतो. ती अपरिहार्य बाब म्हणून स्वीकारावीच लागते. लोकवाङ्:मयात या बोलींचे 'स्व'त्व आणि सत्व मात्र अबाधित ठेवण्यात 'अहिराणी बोली' विषयीचे संशोधन, लेखन न होवून प्रचार-प्रसार होत आहे. ही एक समाधानाची बाब आहे. लोकवाङ्:मयाचे पृथगात्म धन असलेली ही भाषा पुनरूज्जीवित करण्याचे काम अनेक लेखक, संशोधक, साहित्यिक, अभ्यासक करीत आहेत. त्यात आबा महाजन या कवीचे लेखनकर्तृत्व आणि सृजनत्व अधोरेखित करण्यासारखे आहे. खानदेशातील महसूल विभागात अधिकारी असणाऱ्या या साहित्यिकाची साहित्यसंपदा अहिराणी बोली सोबतच एकूणच खानदेशातील साहित्यपरंपरेच्या वृद्धीस श्रेयस्कर ठरणारी अशीच आहे. त्यात 'मन्हा गावले' हा अस्सल 'पूर्ण खानदेशी' अहिराणी बोलीतील कवितासंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरला आहे. कवीच्या अभिव्यक्ती सामर्थ्याबरोबर प्रदेशाशी जुळलेली नाळ किती घट्ट आहे याची, प्रचिती देवून जाणारा हा बालकवितासंग्रह आहे. आबा महाजन यांच्या आदिवासी बोलीतील या वाङ्मयीन निर्मितीमागील प्रयोजन, भूमिका डॉ. गणेश देवी यांनी केलेल्या भारतीय भाषा सर्वेक्षणातून समोर आलेल्या पुढील वास्तवाचाच एक प्राथमिक प्रयत्न वाटतो. ''अनेक भाषा आणि बोली मरत आहेत, मरण पंथाला लागल्या आहेत. ही बाबही सांस्कृतिक दृष्ट्या हानीकारकच ठरणारी आहे. भाषा ही आपले आर्थिक भांडवल आहे. हा त्यांनी व्यक्त केलेला आशावाद वास्तवात येण्यासाठी आपापल्या भाषा आणि बोली यांचे रक्षण प्राणपणाने करण्याची नैतिकता प्रत्येकालाच स्वत:वर लादून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी बोलीच्या अभ्यासाबरोबरच बोलीतील साहित्यनिर्मितीला आणि बोलीच्या उपयोजनाला अग्रक्रम देणे अपरिहार्य ठरावे. बोली संपून जाण्याची प्रक्रिया अधिक वेगाने सुरू होईल.'' (संपादकीय, नवाक्षर दर्शन, जुलै-ऑगस्ट २०१३

पृ.२) आज बोलीतील साहित्यनिर्मितीची शिथिलता, बालसाहित्य निर्मितीविषयीची उदासिनता, थंडावलेली वाङ्:मयीन प्रक्रिया भाषिक पाहता अहिराणी भाषेतील 'मन्हा गावले' या बालकविता संग्रहाच्या माध्यमातून आपली पृथगात्म ओळख अधोरेखित करतात.'मन्हा गावले' या बालकवितासंग्रहात प्रथम दर्शनात लक्षात येते, ती या संग्रहाची आकर्षक, विचारपूर्वक रंगसंगतीने केलेली मांडणी. 'चित्र' या जागतिक भाषेच्या उत्कृष्ट वापर यातून बालकांना गुंतवून, वाचण्यास भाग पाडणारी किमया नक्कीच साधली जाणारी आहे. हे आपलं अन् आपल्यासाठीचंच पुस्तक आहे. ही भावना निश्चितच बालमनात निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही, यात शंका नाही. अहिराणी भाषिकांबरोबरच इतर भाषिकांनाही समजण्यास कठीण जावू नये म्हणून अहिराणी बोलीतील विशिष्ट शब्दांचा प्रमाण मराठी भाषेत दिलेला अर्थ कवितेच्या अर्थानुभुतीस सुलभ करणारा आहे. अहिराणी बोलीतील शब्दांची अर्थश्रीमंती, विचारसौंदर्य खुलण्यास बोलीकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन वृद्धींगत होण्यास बळ देईल. हा आशावाद निर्माण करणारा एक नवीन प्रयोग म्हणून या बालकवितासंग्रहाची नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते.

या बालकवितासंग्रहातून केवळ मुलांचे मनोरंजन न होता खानदेशातील संस्कृती, लोकसंस्कृती, माणसाचं जगणं वर्तनविशेष यांचीही ओळख वाचकांना झाल्याखेरीज राहनार नाही. 'मन्हा गावनी अहिरानी वाचकांना झाल्याखेरीज राहणार नाही. 'मन्हा गावनी अहिरानी चांदी सोनानं धन'' म्हणणारी ही कविता खरोखर बालमनाला मूल्यसंस्कारांची श्रीमंती बहाल करणारी अशीच आहे. बालमनाला कोणत्याही व्यक्तिविषयी, वस्तुविषयी, आधी गोडी वाटणं महत्त्वाचं असतं. या गोडीतूनच त्यांच्या मनात वस्तु, व्यक्तिविषयी आकर्षण, प्रेम, जिव्हाळा निर्माण होवून एक आत्मियतेचं नातं तयार होत जातं. अहिराणी बोलीपासून फारकत घेतलेला, दूर गेलेला

अहिराणी बोलीच्या कुटुंबातील वाचकांचे/बालकांचे मन या कवितांच्या माध्यमातून निश्चितच आपली, बोली, बोलणारी माणसं, समाज, प्रदेशाकडे ओढ हा विश्वास कवीमनाला आहे. म्हणूनच माती आणि माणसं यांच्याप्रती संवेदनशील असणांर मन

'मन्हा गावना माणसं
भलताच करारी
मन्हा गावना माटीवर
ती भरस भारी''

असे गौरवपूर्ण काढते. खानदेशातील मातीतून उगवलेलं हे संवेदनाचे झाड आपल्या बोलीतून व्यक्ती, संस्कृती आणि प्रकृती, प्रवृतींचाही वेध घेतांना दिसते. आशय-विषयानुसार 'मन्हा गावले' या बालकाव्यसंग्रहाचे वर्गीकरण केल्यास १) खानदेशातील लोकसंस्कृती- कानबाई, मरीमाय, गुलाबाई, गवराई विषयक कविता, २) सणउत्सव-पोया, गुढीपाडवा, आखाजी, दिवाई, ३) पित्तरपाटा सारख्या रूढी, ४) व्यक्तिचित्रणात्मक-धल्डा, बहिणाबाई, बुटबैगन, सुकडूराव, ठोम्या, धल्ली, आकाबाई, धुडक्या, खनबुट, सुपडाबोय, निंबा भौ, बायडी, ६) कल्पनात्मक-डेडोर, राजाले भरनं हिवं असे करता येईल. मराठी वाङ्:मयाच्या काव्यक्षेत्रात 'बोलीच' अभिजात असं देणं देणारी 'अपर्ववस्तू निर्माणक्षम प्रज्ञा' असलेली खानदेशची 'लाडकी आंडेर' असलेल्या बहिणाबाई चौधरी यांना कवी बोलीच्या शब्दसूमनांनी आदरांजली वाहतो. परंपरेचं देणं आणि त्याबद्दलची कृतज्ञताच 'खान्देशनं अनमोल धन' म्हणून व्यक्त करतो. परंपरेतील सत्त्वामुळेच 'स्व'-त्वाची ओळख निर्माण होवू शकते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कवी आबा महाजन यांची कविता होय. आबा महाजन यांनी या बालकवितासंग्रहात परंपरा आणि नवता या बरोबरच समाजमन यांच्या वैशिष्ट्यपूर्णतेची सांगड घालित नवी अभिव्यक्ती निर्माण केलेली दिसून येते. लोकसंस्कृतीचा विचार केल्यास माणूस कितीही शिकला, प्रगती केली, तरीही बालवयातील लोकसंस्कृतीच्या आठवणी त्याच्या अबोधमनातील त्या श्रद्धा, प्रथा, रूढी, परंपरांना टाकून देता येत नाही. समाजमनातील लोक संस्कृतींपासूनच त्याचा पिंड

घडत गेलेला असल्याने त्याच्या जगण्याचा तो अविभाज्य भाग बनत जातो. 'पित्तरपाटा' या कवितेतील नातवाला आपण पाहू न शकलेल्या आजोबाच्या मांडीवर बसून खेळता आले नाही. याचे दु:ख तर होतेच, पण त्यांच्यासाठीचा घास चुलीत टाकतांना रडणारे संवेदनशील मन परंपरेतूनच घडत जाते. हे निर्माण करण्यात अपुरी पडत असतांना 'आखाजी'सारख्या कवितेतून येणारी मामाच्या गावातील झोक्याची गंमत, गोड सांजोरीचा स्वाद, खापरावरची पुरणपोळी आणि आंब्याच्या रसाची चंगळ, निंबाच्या झाडाची सळसळ या विषयी कुतुहल मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. मामी आणि मामेबहिण या नात्यातील गोडवा, आत्ममग्न असलेल्या मूलांचे भावविश्व विस्तारत जाते. खानदेशातील संस्कृतीबरोबरच आपल्या गावाविषयी, राहत्या घराविषयी, गावातील माणसंविषयी, माणसामाणसांमधील नात्यांविषयीचा आपलेपणाचा भाव पोहचविण्यात आबा महाजनांची कविता यशस्वी होते. ग्रामीण भागातील इरसाल, भोळी, भाबडी, श्रद्धाळू, कष्टाळू, धूर्त, लबाड, बेरकी माणसं, तर या कवितांतून भेटतात. तशीच खट्याळ, अवखळ, मनमौजी, बेफिकीर, स्वच्छंदी मनाची लहान मुलं, त्यांचं भावविश्व, त्यांच्या बालमनाला सुचलेल्या अफाट, अचाट कल्पना, तर्क आणि निरागस प्रश्न हे कवीमन नजरेआउ करीत नाही. 'मन्हा गावले' या काव्यसंग्रहातील लहान मुलांच्या भावविश्वासोबतच त्यांच्या लकबी व्यक्तिमत्वातील ठळक वैशिष्ट्यांच्या नोंदी, आवडी-निवडी यांची सूक्ष्म निरक्षणं त्यांच्या 'बुटबैंगन', 'सुकडूराव', 'ठोम्या', 'आकाबाई', 'धुडक्या', 'खनबुट', 'बहादूर पोरं', 'बायडी', 'शायले सुट्टी', 'मरीमाय' या कवितांमधून दिसून येतात. 'बुटबैगन' मधील टिल्लू

'आचकवचक खाईसन व्हयी गया ढेबर पोट्या'

असा आहे. तर 'सुकडूराव' मधील सुकडूरावला मात्र,

''खाईसन ढेबरं वाढावा राहू नका सरमट''

असा सल्ला लागतो. लहान मुलांनी नीट आहार घेतला नाही, तर शरीरावर काय परिणाम होतात तसेच अन्नाचे नीट सेवन केले नाही, तर त्याचेही दुष्परिणाम या कवितांमधून बालमनावर ठोम्या, शाळेची कवितेतील ठोम्या, मात्र कमालीचा आळशी, शाळेची आवड नसणारा, शारीरिक क्षमतेमुळे, मात्र पुढे तो ठोम्या राहिला नसून गावाच्या नावाजलेला पहिलवान बनला आहे. 'बुटबैंगन'मधील टिल्लू एखलखुरा, तर 'धुडक्या' लोकांची दिशाभूल करण्यात मात्र स्वत:ला 'अफलातून' समजतो. बालपणी अनुभवलेल्या अनुभावास आलेल्या कष्टप्रद गोष्टींची भीती मुलांच्या मनात नित्य घर करून असतात. (साप. वैगरे) अशा अनेक व्यक्तीचित्रणांबरोबर अनुभूतींचे विश्व 'मन्हा गावले' या बालकवितासंग्रहात खास आपले स्थान राखून आहेत. 'आकाबाई' आणि 'बायडी' या दोन वेगवेगळ्या वयोगटातील दोन मूलींवरील कविता. बालमन ते पौंगडावस्थेतील मुलीच्या भावविश्वाला अधोरेखित करणाऱ्या बालविश्वात बाहुलीशी असलेले नाते विस्मरणात जावून मोठेपणी ते आरशाशी घट्ट होत जाते. मोठेपणी तू काय होणार? या प्रश्नाला बायडीने'मी व्हसू ॲक्टर' हे उत्तर देणे ग्रामीण भागातील मूलींमध्ये 'आत्मभान' जागृतीचे निदर्शक ठरते, तर वडीलांनी लग्न, संसार या रूढ मार्गाचा अवलंब न करता 'तिले करसू कलेक्टर' हे स्वप्न पहाणं ग्रामीण मुलींच्या भविष्यबद्दलचे आशादायक चित्रच आहे. ओरबाड्न घेण्याची संस्कृती विस्तारत असतांना कुडाच्या घरात एकटीच राहणारी 'धल्ली' 'स्व'कडून समूहाकडे जाण्याचा संस्कार, तर देतेच पण ''हाड्याचिड्याले जानीबुजी टाकूस दायदाना'' ही पर्यावरणविषयक जाणिव नकळतपणे बालमनांमध्ये निर्माण करणारी आहे. गाव कुणा एकाचा नसतो. आणि गावात कुणी एकटं नसतं. ही समूह भावना या बालकवितासंग्रहाच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसते. 'निंबा भौ' खानदेशातील शेतकरी नाकासमोर चालणारा, कामात राम शोधणारा, स्वत:शी प्रामणिक राहणारा, कष्टाशी इमान राखणारा, प्रसंगी 'ठगाई जास' नाडला जातो. बालकांसाठीच्या कवितासंग्रहात 'निंबा भौ' 'सरावन झाड' सारख्या कविता बालकविता न राहता अहिराणी भाषेतील या रचना कविची उत्कृष्ट कल्पनाशक्ती

आणि प्रतिमासामर्थ्यांची प्रचिती देणाऱ्या आहेत. 'शायले सुट्टी' या कवितेतून अस्सल ग्रामीण बालमनातील भावविश्वाला चितारणारा अनुभव वाचकांच्या पसंतीस उतरणारा आहे. 'शाळेला सुट्टी' लागल्यावर शहरी तथाकथित मौजमस्तीपेक्षा शेत-शिवार, ढोरं-पोरं-गावरान मेवा यात रमणाऱ्या बालमनाची मौज मनाला हिरवेपण बहाल करणारी अशीच आहे. ग्रामीण शाळकरी मुलांचे मन व्यक्त करणारी चपखल काव्यशैली खानदेशी कृषीसंस्कृतीबरोबरच मुलांचा होणारा भावनिक, सामाजिक विकास याची नोंद घ्यायला भाग पडणारी अशीच आहे. 'शायले सुट्टी' या कवितेतील मुलांच्या मनावर कोणत्याही/कसल्याही स्पर्धेचे/परीक्षेचे/ मार्काचे दडपन नसल्यामुळे शाळेला सुट्टी मिळाल्याचा आनंद मनसोक्त उपभोगण्यासाठी उत्सुक असलेली मनं प्राप्त परिस्थितीविषयी ना खेद, ना खंत करणारी आहेत. उलट आहे त्या वास्तवात आनंद कसा शोधता येईल, देता येईल याचाच शोध घेतांना दिसतात. बालसुलभ अशा कृती, इच्छा, आकांक्षांना भूरळ घालून अकाली प्रौढत्व बहाल करणाऱ्या शहरी संस्कृतीची लागण अजून कृषीसंस्कृतीला झालेली नसल्याचे चित्रण कवी या कवितेतून करतो. जागतिकीकरणाने खेडी उध्वस्त केलीत, तरी खेड्यातील माणसांच्या मनातील गावाविषयीच्या आपलेपणांच्या भावना उद्ध्वस्त करण्यास मात्र अजूनही यश मिळविलेले नाही. 'मन्हा-गाव' या कवितेतून आबा महाजन वाहिलेल्या गंगेविषयी नोंद घेतातच, पण राहिलेल्या तीर्थांविषयी तितक्याच आत्मियतेने व्यक्तही होतात. दोनचार रंगाच्या कुंचल्यातून क्षणात एखादे चित्र चित्रकार आपल्या कौशल्यातून कागदावर चितारतो. तद्वतच अहिरानी बोलीची समृध्दता लाभलेले हे कवीमन 'आम्हनं घर' शीर्षक असलेल्या कवितेतून घराच्या बाह्य दर्शनाबरोबरच संस्कृती, संस्कारांचे दर्शनही मोजक्या शब्दात घडवून आणण्यास प्रभावी ठरते. 'मन्हा गावले' या कवितेतून समृद्ध अशा कृषीसंस्कृतीविषयी बोलतांना सांस्कृतिक इतिहासही कवी नोंदवून जातो. 'खानदेश' या कवितेतून खानदेशचा वाङ्:मयीन सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक, स्थळ यांच्या उल्लेखातून प्रदेशाभ्रमणाचा आनंद मिळतो. थोडक्यात व्यक्तिचित्रणातून गावातील साधेपणात मौलिकपणा जपणारी माणसं, आपलं बालपण हरवू न देणारा निसर्ग आणि जीवन यांचा मनसोक्त आनंद घेणारी मुलं आबा महाजन यांच्या कवितेतून अनुभवता येतात. 'गावपन' जपणारी गावातली माणसं यांच्याबरोबर खानदेश प्रदेशाची होणारी ओळख त्यातून अहिराणी बोलीतून येणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण शब्दांची अर्थाभिव्यक्ती एक वेगळा परिणाम साधणारी आहे. उदा. गटाना, चिघूर, चटोरा, रोट, गचकाई, कटूभोप्या, कयकटेल, साटा, कुस्यय, तितंबा, ठगाई, दुस्सर इ. आबा महाजन यांचा कवितांमधील प्रतिमाविश्व उभारायला निश्चितच कवीला मदत होत असते. म्हणूनच कवी आपल्या काव्यात जी प्रतिमासृष्टी निर्माण करतो त्या प्रतिमासृष्टीला त्या-त्या प्रदेश, समाज, संस्कृती, व्यवहारांचे बोलीचे संदर्भ आढळतात. कवीच्या प्रतिमानिर्मितीमुळे दैनंदिन व्यवहारातील बोलीला अर्थ प्राप्त होतो. प्रचलित अर्थापेक्षा नवे रूप, नवा अर्थ कवी आपल्या विशिष्ट रचेनतून त्या शब्दांना प्राप्त करून असतो. 'मन्हा गावले' या बालकवितासंग्रहातील 'सरावन-झाड' ही अशीच आबा महाजन या कवीच्या प्रतिमा निर्मितीविषयी विचार करायला लावणारी, लक्ष वेधून घेणारी कविता. उदा. 'सरावनी भूल', 'शितोडासनी पेरनी', 'हयदी ऊन','सुगीनं पाऊल' यासारख्या प्रतिमा, तर 'बहिणाबाई' या कवितेतील 'शब्दसना मया' ही एकमेव प्रतिमा आशय अभिक्तीच्या अंगाने सौंदर्य वाढविणाऱ्या अशाच आहेत. एखाद्या बोलीतील शब्द अशा उपयोजनातून व्यापक अर्थाने प्रसरणशील पावू शकतात. कवितेमध्ये भाषेच्या अनेक शक्यता पडताळून पाहण्याचे सामर्थ्य असते. एखादी बोली प्रौढ, प्रगल्भ, वृद्धींगत व्हायला हवी. नवनवीन शब्दांची नावीन्यपूर्ण अशी भर पडायला हवी. जेणेकरून त्या त्या बोलींचे सौंदर्य वाढत जावून तिचा प्रसार व्यापक होईल. आबा-महाजन यांच्या या बालकवितांसग्रहातील 'सांग ना वो माडी' ही कविता 'सांग ना ग आई' या कवितेची

आठवण करून देणारी आहे. या कवितेतील मुलाच्या निरागस मुलाला अनेक बालसुलभ प्रश्न पडतात.ते प्रश्न बोलीभाषेतून कवितेच्या माध्यमातून विचारतोही. या कवितेतील ह्या शब्दांची बालसुलभ मनाच्या आकलनाच्या मर्यादा, शब्दसमृद्धतेच्या मर्यादा न समजून घेता, केवळ बोलीभाषेतून निर्मिती करायचीच या अट्टहासाने केलेली मांडणी दिसून येतो. उदा. अहिराणी बोलीत 'कोड' हा शब्द उखाणा किंवा 'आहना' या अर्थाने प्रचलित आहे. तसाच तो माणसाच्या अंगावरील पांढरे व्रण त्यालाही 'कोड' म्हणतात. प्रौढ मनात कोडं पडतं. लहान बालकांच्या मनातल प्रश्न निर्माण होतो. 'कोडं पडणं' हा प्रमाण मराठी शब्द आहे. शिवाय अहिराणी बोलीतील शब्दांचे ध्वनीरूप लिपिबद्ध आहे. शिवाय अहिराणी बोलीतील शब्दांचे ध्वनीरूप लिपिबद्ध करतांना ते निरर्थक तर होत नाहीना याचाही विचार व्हायला हवा उदा. कोडसना–कोडस्ना (पृ.१५), खेत–खेयत (पृ.३८), अइकतीन–आयकतीन (पृ.१०), मुकताई–मुक्ताई (पृ.३), लकसमीन–लक्समीनं (पृ.३५), आमी–आम्ही (पृ.३०), तुमी–तुम्ही (पृ.२७), तन्ह–त्यांना (पृ.२६), तसनासाठे–त्यास्नासाठे (पृ.२७) तन्ह–तुम्ही (पृ.२७), तन्ह–त्यान्ह (पृ.११), तसनासाढे–त्यास्नासाठे (पृ.२३), तना–त्यांना (पृ.११), सितडा–शितडा (पृ.१७). 'चानवरे' या कवितेतील पबलांकशी दोसती व्हईसनं या ओळीतील 'पबलीकशी' हा शब्द लय खंडीत करतो तसेच 'कानबाई' या कवितेत 'घरघरमा गेट, भाजीकरीना' ही रचना सभ्रमात पाडणारी अशीच आहे. कारण रोट म्हणजे गव्हाच्या पीठाची जाड पोळी किंवा पुरणपोळी असते. मग, 'भाजीभाकरीसना' हा शब्द वाचून कानबाई या उत्सबाबद्दल जाण असलेला वाचक काहीक्षण रेंगाळतो. संभ्रमात पडतो. केवळ रचनेच्या प्रेमात पडुन बोलीचा वापर करायचाय म्हणून प्रयोग करतोय असे न होता. अर्थ, नाद यांचाही विचार होणे गरजेचे वाटते. एखाद्या बोलीतून कविता लिहायची असं ठरवून चांगली कविता मग. ती बालकविता का असेना निर्माण होऊ शकते का? कारण अशी निर्मितीत कवीचं सगळं लक्ष कवितेपेक्षा वापरल्या जाणाऱ्या बोलीवरच राहतं आणि मग, तो बोलीच्या बोलीतील निरनिराळ्या शब्दांमध्येच गुंतून, तर पडत नाही ना? अस प्रश्न निर्माण होतो. फोटोसाठी ठरवून पोज देणे आणि आपल्याला हव्या असलेल्या शब्दांसाठी कवीच्या शब्दरचनेची कारागिरीच अधिक वाटते. अर्थात या सर्व मला वैयक्तिक जाणवलेल्या मर्यादा पण, 'गवराई', 'सरावन झाड', 'खानदेश', मन्हा गावं', 'गुलाबाई', आम्हनं घर, 'पोया', 'कानबाई' या सारख्या कविता अस्खलित अहिराणी बोलीतला बाज दिमाखाने मिरवणाऱ्या कविता आहेत. तर, 'सपन मझार' 'सपनमा उना साप', 'सांग ना वो माडी', 'शायले सुट्टी' या बालकविता अहिराणी बालकवितेच्या प्रांगणातील आरंभ पाऊल ठरावे अशाच आहेत. त्या वाचल्यानंतर ''अहिराणी भाषेतील नामशेष होऊ पाहणारे अनेक शब्द जतन करणारा हा कवितासंग्रह खरोखरच अहिराणी बोलीचा भाषिक ठेवा समृद्ध करणारा असाचा आहे.'' कवीच्या या मताशी नि:संशयपणे सहमत व्हावेच लागते.

# मंत्रमुग्ध करणारा आबा महाजन यांचा बिस्किटचा बंगला

अशोक कोतवाल
जळगांव

मुलांच्या भावविश्वात जाऊन त्यांचे अनुभव, त्यांच्या कल्पना, त्यांच्या भाववृत्ती, त्यांच्याच शब्दांत सहजपणे शब्दबद्ध करणे ही फार अवघड गोष्ट आहे. ज्यांच्या आंत एक अवखळ, मिश्किल आणि शोधक वृत्तीचं लहान मूल दडलेलं असतं. तिच व्यक्ती मोठ्यांनाही डोलायला लावणाऱ्या सकस व नितांत सुंदर अशा बालवाङ:मयाची निर्मिती करू शकते. बऱ्याच मोठ्या माणसांना तर लहान मुलांशी संभाषण कारण ही खूप अवघड गोष्ट वाटते, मग मुलांना समजून घेणं तर फारच दूरची बाब आहे.

मराठी वाङ:मयात बालकुमार वाङ्:मयाचा एक कोपरा फार समृद्ध आहे. प्रत्येक काळात खूप मोठ्या व्यक्तींनी त्यात भर घातलेली आहे. तरी प्रौढ वाङ्:मयाशी तुलना केली तर बालकुमार वाङ्:मय तसे उपेक्षितच राहिले आहे. याला अनेक कारणं असू शकतील पण पुन्हा लहान मूल होऊन या वाङ्:मयाचा आस्वाद घेण्यासाठी आपल्या प्रौढपणाचं जोखड फेकून देणं प्रौढांना जमत नसावं, असंही मला वाटतं.

खानदेशला जशी प्रौढ वाङ्:मयाशी मोठी परंपरा आहे तशी बालकुमार वाङ:मयाची देखील समृद्ध परंपरा आहे. अगदी मागे जाऊन विचार केला असता बालकवींनी देखील 'आई, आई चांदोबा मंदता देई' ही बोबड्या बोलातील कविता किंवा 'घोडा घोडा', 'रागो आला', 'चिमणीचा घरटा' चोरीस गेला अशी शब्दमधूर बालगिते लिहिली. तसेच 'करील, मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे असे म्हणणऱ्या साने गुरूजींना बालकुमार साहित्यात अत्यंत आदराचे स्थान आहे. पुढे के. नारखेडे, ग.ह. पाटील, 'छान किती दिसते फुल-पाखरू' ही गाजलेली कविता लिहिणारे अ.ज्ञा. पुराणीक धो.वे. जोगी, वा. रा. सोनार, वि.भा. नेमाडे, श. रा. राणे, प्र.श्रा. चौधरी, प्रभाकर महाजन, सुभाषचंद्र वैष्णव, अशोक सोनवणे, अशोक कोळी आणि आता आबा गोविंदा महाजन पर्यंत ही परंपरा अखंडपणे सुरू आहे.

केवळ बालवाङ:मयाशी निष्ठा ठेवून सातत्याने बालसाहित्य निर्मिती करणारे. आबा गोविंद महाजन यांनी मराठी बालकुमार साहित्यात स्वत:ची मुद्रा उमटवली आहे. बाविसाव्या वर्षी पुण्याच्या गमभन प्रकाशनाने त्यांचे 'गंमतीच्या राज्यात' हे पहिले पुस्तक प्रकाशित केले. बालकुमार वाङ्:मयातील अनेक महत्वाच्या पुरस्कारांनी ते गौरविले गेले. त्यानंतर किशोर, टॉनिक, गंमतजंमत, कुमार, आनंद वगैरे सारख्या बालकुमार साहित्याला वाहिलेल्या दर्जेदार मासिकातून ते सातत्याने लिहू लागले. प्रकाशन क्षेत्रात नावाजलेल्या प्रकाशकांनी त्यांची दहा-बारा पुस्तके प्रकाशित केली. 'टांगाटोली' या बालकथासंग्रहातील 'दिनूची ही कथा इयत्ता आठवीच्या सुलभ भारती मराठीच्या क्रमिक पुस्तकात अभ्यासक्रमात आली. 'लई मज्जा रे' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा बालकुमार वाङ्:मयासाठी देण्यात येणारा 'भा.रा. तांबे पुरस्कार' आणि पुन्हा

दुसऱ्यांनदा 'बिस्किटचा बंगला' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा 'वा. गो. मायदेव पुरस्कार' (२०१०) प्राप्त झालेला आहे. ही विशेष बाब म्हणता येईल.

आबा महाजन यांच्या 'बिस्किटचा बंगला' ची कवी मंगेश पाडगावकडर यांनी 'आबांनी बांधला बिस्किटचा बंगला' अशी पाठराखण केलेली आहे. ती रास्तच आहे. त्यातील प्रत्येक कविता बिस्किटसारखी मधूर खुससखुशीत व बरेच दिवस मनात रेंगाळत राहिल अशीच आहे.

'बिस्किटचा बंगला' मधील बालगीतं वाचतांना त्यातील शब्द ओठांवर येऊन बोटं केव्हा ताल धरतात हे कळतही नाही! ही लय आणि सूरांची भाषा आबा महाजन यांना सहज साध्य झाली आहे. हेच त्यांच्या लेखनाचं बलस्थान आहे. पहिल्याच कवितेत कित्येक मुलांच्या जीवनात घडलेला प्रसंग ते किती सहज-पणे टिपतात.

काल किनई मी,
खात होतो भात
खाता खातांच
पडला माझा दात

आबा महाजन यांनी मुलांच्या रोजच्या जीवनातले अनुभव आपल्या कवितेचा विषय बनविले आहेत. मग त्यात अभ्यासाचा कंटाळा करणारा 'ठोंब्या' असेल, रोजच्या सकस जेवणाऐवजी पाव खाऊन हडकुळा राहिलेला 'सुकडूराव' असेल, बिनधास्त वागणारा 'टेन्शन कायको लेनेका' म्हणणारा मोठा भाऊ असेल. घरात लावलेल्या 'फोटोतले पणजोंबा' च्या मिशा कुतूहलाने बघणारा चिमुकला असेल किंवा खेड्यातील शेतात गुरांमागे फिरणाऱ्या गुराखी मुलाचं जगणं असेल आबा महाजन अगदी सोप्या भाषेत चित्रमय शैलीत हे भावविश्व रेखाटताना दिसतात.

तसेच पारंपारिकं बालकवितेत मुलांना आकर्षित करणारे काही ठराविक प्राणी हत्ती, माकड, वाघ, मांजर, ससा, कोल्हा इ. महाजनांच्या कवितेतही आहेत. पण त्यात नाविन्य आहे. त्याच बरोबर चंद्रावर गेलेला रोबो, कोल्होबा थापाड्या डॉट कॉम, चांदोबा नगरीत लॅपटॉप जंगलातली शुटिंग. हे हल्लीच्या युगातील मुलांना परिचित असलेली पात्रही येतात. नव्या युगातील बदल आणि त्यांचा मुळांशी असलेला संबंध टिपायलाही महाजन मागे नाहीत ही एक आशादायक बाब आहे. 'माशीला फाशी', 'मिशीत हसला', 'बोचरा' 'जगंलातील शुटिंग' या फार मजेशीर, अनुभवातून आलेल्या सकस कविता आहेत. आबा महाजन यांनी निरागस्त बालमनाचा अचूक वेध घेऊन कुणालाही मंत्रमुग्ध करेल असा 'बिस्किटचा बंगला' रचलेला आहे.

आबा महाजन आता जरी प्रशासकीय सेवेत असले तरी ते दहा-बारा वर्ष प्राथमिक शिक्षक होते. तेव्हा मुलांच्या भावविश्वाचा तळ ढवळून काढण्याचे सामर्थ्य व लालित्यपूर्ण संवाद करण्याची भावपूर्ण शैली यामुळे त्यांची बालकविता टवटवीत व आनंद देणारी आहे. त्यांची कल्पनेची भरारी आणि समर्पक शब्दकळा कशी, ते म्हणतात.

बिस्किटच्या बंगल्यासमोर
लाडूची झाडे
बगीच्यात उगवतात
जिलेबी अन पेढे

आबा महाजन असेंच मुलांच्या भावजीवनात खोलवर डोकावत राहिले तर त्यांच्या हातून उत्तरो-तर अशीच सकस साहित्य निर्मिती होऊन, मराठी बालकुमार साहित्यात मोलाची भर पडेल या शंका नाही. मी त्यांना सुयश चिंतीतो.

# आबा महाजन यांच्या बालसाहित्याचा प्रवास...

डॉ.फुला बागुल
शिरपूर

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्री.आबा गोविंदा महाजन,यांची नव्या पिढीसाठी संस्कारक्षम अशी प्रेरणादायी कादंबरी ठोंब्या दिलीपराज प्रकाशन पुणे यांनी जुलै २०१५ मध्ये प्रकाशित केली.दुसरी आवृत्ती सप्टेंबर २०२१ मध्ये प्रकाशित झाली.बाल वाङ्मय चाहते आणि अभ्यासक वाढल्याची समाधान देणारी बाब आहे.ही कादंबरी त्यांनी श्याम,गोट्या,फास्टर फेणे,धर्मा, बोक्या सातबंडे या बालसाहित्यातल्या बाल नायकांना अर्पण केली आहे ही बाब अर्थपूर्ण आहे.

वरील बालनायक विशिष्ट अशा वातावरणातून घडलेले आहेत.तथापि ठोंब्या मात्र गावाचा,ग्रामीण बालविश्वाचा प्रतिनिधी आहे.शहरी बालनायकांच्या तुलनेत ते कुठेही कमी नाही किंबहूना संस्कार सिंचनाच्या,जनप्रबोधनाच्या दृष्टीने मोठीच जबाबदारी घेणारा हा बालनायक,किशोर नायक आहे. बालवाङ्मयाकडूनच्या अपेक्षांचे वर्तुळ ठोंब्याने विस्तारले आहे. बालवाङ्मय बालकांची जिज्ञासा उंचावणे, कुतूहलाची पूर्ती करणे,अद्भूतरम्यतेची सफर घडविणे यासारख्या उद्दिष्टांची पूर्तता करीत राहिले.या पार्श्वभूमीवर महाजनांचा बालनायक ठोंब्या वरील उद्दिष्टये तर साध्य करतोच पण त्या पलिकडे तो झेप घेतांना दिसतो.

ठोंब्याला गावाच्या समस्यांचेभान आहे,सार्वजनिक प्रश्नासंदर्भात ग्रामजन संवेदनशील असतात पण त्याच बरोबर कृतिशुन्यही असतात.हे ही ठोंब्याला कळले आहे,ग्रामीणांच्या वृत्तीप्रवृत्ती त्याला ठाऊक आहेत.त्या वृत्तींचा सकारात्मक,विधायक असा काही उपयोग करुन घेता येईल असा प्रगल्भ विचारही ठोंब्याकडे आहे.त्याचबरोबर समूहजीवनाचे संस्कार त्याने पचविले आहेत,ग्रामविकास हा लोक सहभागातून शक्य आहे,हे ठोंब्याने जाणले आहे. आपलं जगणं मानवी समूहाच्या कणभर का होईल ना समृध्दीसाठी असले पाहिजे हे ठोंब्याला आतून जाणवलं आहे,त्या दृष्टीने संपूर्ण कांदीबरीभर तो वावरतो.

ठोंब्याचं अफलातून स्वप्न,ज्योतिषी बुवांना शिकवला धडा,ठोंब्यांचं सामान्य विज्ञान,छडी,असा पकडतो ठोंब्या चोरांना,सलाम टॉमी,वाढदिवसाची अनोखी भेट, ठोंब्याची आयडीया या प्रकरणातून परोपकारी, समाजसेवी, विज्ञानवादी,विजिगिषू,कल्याणकारी ठोंब्या श्री.आबा महाजन यांनी साकारला आहे.हा ठोंब्या आजवरच्या बालनायकांपेक्षा वेगळा आहे.हे उपरोक्त विवेचनावरुन सिध्द होते.

कादंबरीतले वातावरण ठोंब्याला घडवते.या वातावरणात आमराई आहे,चावडी आहे,नदीवरचे पोहणे आहे,आबाधाबी सारखे खास ग्रामीण खेळ आहेत.जोगेश्वरी हे ग्रामदैवत आहे,शाळेची कौलारु इमारत आहे मारोतीचा पार आहे,गवती रानवाट आहे,विष उतरणारा मांत्रिक,भविष्य सांगणारा पोपट आहे,खेडी कढोलीचे गुरुजी आहेत,गोठ्यांमध्ये हंबरणारी गुरे आहेत,शेणपाणी करणारा सालदार आहे,बैलपोळ्याला होणारी पुरणपोळी आहे,सर्जाराजाची जोडी आहे.चोपड्याला भरणारा गुरांचा बाजार आहे,मुंजोबाची जत्रा आहे,मंदिरातलं कीर्तन आहे,निर्मलग्राम पुरस्कार

आहे,म्हणून ठोंब्या हा खास ग्रामीण बालनायक आहे,मराठी बालसाहित्य विश्वातला तो पहिला ग्रामीण बालनायक आहे.

ठोंब्या हा बालनायक पुढे ठोंब्या,टकलू अंकल आणि इतर कथा या बालदोस्तांसाठीच्या अफलातून चित्रकथेत येतो.श्री.आबा महाजन यांची ही चित्रकथा ग्रंथाली प्रकाशन मुंबईने नोव्हेंबर २०२० मध्ये प्रकाशित केली.यातला ठोंब्या मिश्किल आहे.त्यांची बालसुलभ मिश्किली टकलू अंकल,बोलबच्चन ठोंब्या या दोन चित्रकथातून दिसून येते.ठोंब्या कादंबरीतला ठोंब्या आणि चित्रकथेतला ठोंब्या ही तशी दोन टोके आहेत.प्रस्तुत चित्रकथेच्या आशयास अनुरुप असे वर्तन येथला ठोंब्या करतो.

कार्टुन प्रकारातील हा चित्रकथा संग्रह आहे.यात अवघ्या तीन चित्रकथा आहेत.त्यातल्या दोन कथात ठोंब्या येतो.पहिला कथेतला ठोंब्या टकलू अंकल या स्वार्थी कवीला त्याच्या संग्रहासाठी शीर्षक देतो.सहज चर्चेतून घरीदारी हा शब्द ठोंब्याच्या मुखातून बाहेर पडतो आणि तोच शब्द टकलू अंकल हा कवी टिपून घेतो.यमकानुप्रासी बोलणे  टकलू अंकल या कवीस प्रभावित करुन जाते.पुढे हाच कवी ठोंब्याकडून मैदानाची साफसफाई करुन घेतो.पुढे याच मैदानावर कवी संमेलन होणार असते.हे कळाल्यावर ठोंब्या डोक्यास हात लावतो.टकलू अंकल स्वार्थी असल्याचे ठोंब्यास उशिरा लक्षात येते.ठोंब्याच्या दुसऱ्याच्या उपयोगी यावे या वृत्तीचा प्रत्यय देणारी ही चित्रकथा आहे.

दुसऱ्या कथेतला बोलबच्चन ठोंब्या हजरजबाबी,चाणाक्ष आहे.होमवर्क अपूर्ण राहिल्याबद्दल शिक्षक त्यास बाकावर उभे राहण्याची शिक्षा सुनावतात पण ठोंब्या नकार देतो.मग पालकांना बोलावून आण असे शिक्षक फर्मावतात,चाणाक्ष ठोंब्या पुन्हा तेच उत्तर देतो– त्यांच्याही पायाला दुखापत झाली आहे.शिक्षक दुखापतीचे कारण विचारतात.बाईकच्या अपघातामुळे दुखापत झाल्याचे ठोंब्या सांगतो.आमच्या बाईकने जोरदार ठोस मारली,असे ठोंब्या म्हणतो.मग,तुम्ही ज्यांना ठोस मारली त्यांनाही खूप लागले असेल ना!असा प्रश्न शिक्षक उपस्थित करतात.कथेच्या शेवटी रस्त्यात उभ्या असलेल्या बुलडोझरला ठोस मारली हे उत्तर ऐकून शिक्षक डोक्यास हात लावतात.ठोंब्या बोलबच्चन आहे.हजरजबाबी,चाणाक्ष असल्याचे सिध्द होते.

ठोंब्या कादंबरीतला ठोंब्या कल्याणकारी आहे,चित्रकथेतला ठोंब्या मिश्किल,चाणाक्ष,हजरजबाबी आहे.

श्री.आबा महाजन यांनी मराठी बालसाहित्यात हा असा आगळा वेगळा अपूर्ण बालनायक आणला आहे. एकाच वेळी त्यास समाजभान आहे. आणि बालसुलभ खोडकरपणाही आहे.हा नायक मराठी बालसाहित्य प्रांगणात आपला ठसा उमटवील यास शंका नाही,तो प्रस्थापित होईल,समाजाचे नवे प्रश्न सोडविण्यात तो स्वत:ला गुंतवून घेईल अशी अपेक्षा दोन्ही साहित्यकृतीतल्या ठोंब्याने निर्माण केल्या आहेत.पुढील साहित्यकृतीतला ठोंब्या आपल्या खास भाषेसह आविष्कृत होईल अशी अपेक्षा करु या!

# ठोंब्या गेला मंगळावर (दीर्घ बालकविता)

आबा महाजन विशेष

उमेश मोहिते
बीड

साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवले गेलेले बालसाहित्सिक आबा गोविंदा महाजन लिखित ठोंब्या गेला मंगळावर हा सुंदर बालकवितासंग्रह म्हणजे एक दीर्घ विज्ञान बालकविता आहे.तसेच अतिशय सुंदर असे कथाकाव्यही आहे.

मंगळ ग्रहाच्या संपूर्ण सखोलशास्त्रीय माहितीची रंजनपर गोष्ट कवीने अगदी कल्पकतेने आणि कौशल्याने कवितेच्या रुपात साध्या-सोप्या शब्दातून इथे गुंफली आहे.ठोबेफाटा खुर्द या खेड्यातला ठोंब्या नावाचा विज्ञानाची आवड असलेला मुलगा नील ऑर्मगस्ट्रॉगच्या गोष्टी वाचत असतो.त्याला ग्रह,तारे, सूर्यमाला, पृथ्वी, आकाश आणि मंगळ यांचे फार आकर्षण असते.एके दिवशी त्यांच्या स्वप्नात नील आर्मस्ट्रॅंग येतो आणि त्याला थेट मंगळावर सफर करुन रेकॉर्ड करण्याचे सांगतो.ठोंब्या मंगळ ग्रहाची माहिती मिळवतो.व मोठी दुर्बिण घेऊन आकाश न्याहाळात राहातो.पुढे तो मंगळयानही बनवतो आणि मंगळावर सफरीला जाण्याची घोषणा करतो.त्याला आई,वडील,काका विरोध करतात,मात्र तो विचलित न होता गुगलवरुन मंगळाची माहिती घेतो.नेटवरुन थेट शास्त्रज्ञांकडूनही माहिती घेतो.सोबत टॉफी,ब्रश,कॉफी,वही-पेन घेऊन तो मंगळावरचे अनुभव सांगताना कवी म्हणतो:

मंगळावरच दिसली त्याला,खोल खोल दरी
जागोजागी विवरे,खडक आणि कपारी
बापरे बाप,इथं फक्त दगडमाती
नु नाही,जंगल नाही,गवताची पाती

तेथील अनोखे विश्व बघून तो चकितही होतो आणि घाबरुनही जातो.एवढयात मंगळबाबा प्रकटतो आणि त्याला मंगळ ग्रहाचे संशोधन करण्याचा सल्ला देतो,ठोंब्या मग माती कपाळाला लावून मंगळावर नंदनवन फुलवण्याची शपथ घेतो.

नंतर तो खुश होवून सेल्फी काढायाचा प्रयत्न करतो,पण तोला जाऊन दरीत पडतो.तो मग झोपेतून अगदी किंचाळतच उठतो.ठोंब्याची ही सफर म्हणजे त्याला पडलेले स्वप्न असते.थोडक्यात,कवीने मंगळ ग्रहाची सारी वैज्ञानिक माहिती आणि ज्ञान रंजक आणि ओघवल्या शैलीत ठोंब्याच्या या मजेशीर नि भन्नाट गोष्टीव्दारे मांडले असून हरेक पानावर त्याच्या रोमहर्षक मोहिमेचा प्रवास दर्शवणारे रंगीत चित्र असल्याने मुलांना हे पुस्तक खूप खूप आवडेल आणि त्या सोबतच ते भान हरपून या कवितेत रमतील,हे नक्की!

आबा महाजन विशेष

# सालदाराचा मुलगा ते साहित्य अकादमी पुरस्कार विजेता

सुधाकर जाधव
जळगांव

जळगांव जिल्ह्यातील एरंडोलमध्ये सालदाराच्या घरात जन्मलेल्या आबा गोविंदा महाजन यांनी शिक्षक,नायब तहसीलदार ते तहसीलदार पदापर्यंत मजल मारली.त्यांनी बालसाहित्यात राज्य पुरस्कारांची हॅट्रिक केल्यानंतर 'आबाची गोष्ट'या कथासंग्रहावर बालसाहित्यातील साहित्य अकादमीची मोहोर उमटली.शिक्षक असतांना साने गुरुजी,बालकवी बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याच्या लाळा लागल्यानंतर बालसाहित्य लिहिण्याचे मनी ठाणले.वेगळ्या प्रयोगाची दखल निश्चित घेतली जाईल.असे वाटायचे.प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या,जिद्दी मुलांच्या या कथांची दखल घेतल्याचे मनस्वी समाधान वाटत असून त्यांचे श्रेय खान्देशातील मुलांना असल्याचे साहित्यिक तथा तहसीलदार आबा महाजन दिव्य मराठी ला सांगत होते.त्यांच्याशी झालेल्या संवाद त्यांच्यात शब्दांत..एरंडोलमध्ये सालदाराच्या कुटुंबात माझा जन्म झाला. 'आबाची गोष्ट' मधील १७ कथापैकी निम्म्या कथा एरंडोलच्या वातावरणातील,खान्देशी बोलीत आहेत.प्राथमिक शिक्षक तेथेच झाले.नोकरी लवकर मिळण्यासाठी त्यांनी.डी.एड.केले.जामनेर व एरंडोल तालुक्यात प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले.तेथे साने गुरुजी,बालकवी,बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचा लळा लागला.स्वत:ही मुलांसाठी लिहावे.असे वाटू लागले.तेथून बालसाहित्याचा प्रवास सुरु झाला.सन१९९३-९४ मध्ये पहिली कविता किशोर मासिकात प्रसिध्द झाली.सन२००९ मध्ये 'गमतीच्या राज्यात'हे पहिले पुस्तक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतिचा मंडळाच्या अनुदानातून प्रकाशित झाले.त्यालाही अनेक पुरस्कार मिळाले.खान्देशात ना.धों.महानोर,अशोक कोतवाल यांच्यानंतर राज्य शासनाचा पुस्कार मिळवणारा मी तिसरा साहित्यिक.राज्य शासनाचा पुरस्ककारांची हॅट्रिक झाली.सन २००८-९-२०१०-२०११,२०१३-१४ असे तीन पुरस्कार बालसाहित्यात बालकवितेमध्ये मिळाले सन २०१० मध्ये नायब तहसीलदार झाले.तोपर्यंत पारंपारिक,साचेबृध्द पध्दतीने बालसाहित्य लिहित होतो.बालसाहित्यामध्ये प्रयोग करणे आवश्यक असल्याचे सन २०१० मध्ये वाटू लागले.तोचतो प्रकार मुले वाचन नाहीत.प्रयोग करायला सुरुवात केली.'मन्हा मामानं'जावू'या पुस्तकात अहिराणी,मराठी असा व्दिभाषिक प्रयोग केला.त्याला राज्य शासनाचा बालकवी पुरस्कार मिळाला.मन्हा गावले अहिराणी बोलीतील पुस्तक प्रकाशित झाले.आबांची गोष्ट हा कथा संग्रह प्रमाणभाषेतील असला तरी खान्देशी बोलीतील शब्द पेरले आहेत.मुले सहज वाचतील असा त्या कथा आहेत.हा कथासंग्रह वाचल्यानंतर बाबा भांड,राजन गवस यांच्या प्रतिक्रिया आल्या.खुद्द भालचंद्र नेमाडे यांनी फोन केला.पुस्तक वाचले व आवडल्याचे सांगितले.

(दै.दिव्यमराठी मधून साभार)

# विशिष्ट वर्गीय मानसिकता त्यागातच मराठीचे भले



विलास देशपांडे
नागपूर

आदिम जंगले आणि जमाती यांच्यात होणारा संस्कृतीचा तथाकथित प्रसार ही एक प्रकारे कित्येक भाषांसाठी मृत्यूघंटाच आहे. आज इंग्रजीच्या स्वरुपात ती सगळ्या जगावर वाज आहे.गेल्या पाच-सात दशकांमध्ये इंग्रजीने जगातील बोलिभाषांच नव्हे तर प्रमुख भाषांसाठी देखील एक प्रकारची दहशत निर्माण केली आहे. त्याला मराठी भाषा अपवाद नाही.तथापि दहशतीची खरी भीती ही इंग्रजीसारख्या बाह्य घटकांपासून नसून अंतर्गत शत्रूंपासून आहे हे कटू सत्य नाकारण्यात काही हशील नाही.

अलीकडच्या काळात इंग्रजीचे प्राधान्य वाढण्याचे आणि ती सर्व समावेशक होण्यास प्रामुख्याने अमेरीका कारणीभूत आहे.२० व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकन अर्थव्यवस्था,अमेरिकेचे सार्वभौमत्व आणि त्याची सर्जनीलता ह्यांनी त्यांचे विभिन्न वेशभूषेतील राजदूत आज केवळ भूतपूर्व इंग्रजी वसाहतीमध्ये नव्हे तर इंग्रजी न बोलणाऱ्या जगात देखील पाठविण्यात सुरुवात केली आहे. हॉलिवुड, भांडवलशाही,डोमिनो सिध्दांत, बहुराष्ट्रीयत्व, संगीत, वाहनउद्योग,स्टारडन्स,माहिती तंत्रज्ञान क्रांती,मेट्रो, मॅकडोनल्डस, व्हॉईस ऑफ अमेरिका,शस्त्रास्त्र उद्योग,बेस्ट सेलर्स, आऊट सोर्सिंग आणि तितकेच महत्वाचे विज्ञान व तंत्रज्ञान या सर्व गोष्टी इंग्रजी भाषानामक सार्वत्रिक विषाणुच्या वाहक आहेत.आजचे बहुतांश लिखाण तर जगापर्यंत पोहोचवावे असेल तर ते हटकून इंग्रजीतून करावे लागते.इंग्रजीने लिहिणाऱ्या जगातील विविध लेखकांना पक्के धरुन ठेवले आहे.

मराठी भाषेतून लिखाण करणारे आपले लेखक-नेमकेपणाने सांगायचे झाल्यास-या लेखक मंडळींमध्ये एकजुटीची व सौहार्दची भावना असावी,त्यांच्यात आपआपसात एक सुदृढ देवाण-घेवाणही असावी,त्यांना एकमेकांच्या साहित्याबद्दल अभिरुची वाटत असावी;दूदैवाने हे घडत असताना दिसत नाही.मराठी लेखक गटागटातून विखुरले गेलेले आहेत.हे मराठी माणासातील मुळ स्वभावाला अनुसरुनच आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील लेखक विदर्भ,कोकण,मराठवाडा,खानदेश येथील लेखक एखादी उत्सुकतेची प्रासंगिक झलक वगळता आम्ही आमच्याच विश्वात गुंग होऊन पडलो आहोत असे भासावे असे एकूण चित्र आहे.पण सर्वसाधारणपणे बोलायचे झाल्यास पुण्यामुंबईकडील मराठी लेखकांना महाराष्ट्राचा इतर विभागीय भागातील मराठी लेखकांनी आपापल्या भागात भाषा साहित्यात काय काम चालले आहे ह्याच्याशी काही देणेघेणे असेल याबद्दल साशंकताच आहे. पश्चिम महाराष्ट्रकडील मराठी लेखक/लोक अन्य कोणत्याही मराठी भागात बोलल्या जाणाऱ्या भाषेकडे कसे पाहतात? त्यांच्याही लेखी भाषा वा बोली भाषा चेष्टेचा विषय आहे का? याबाबत ठाकम असे सांगता येणार नाही. पण वरिष्ठ आणि कनिष्ठ लेखक असा भाव मात्र नेहमीच जाणवत आला आहे.

आपले मराठी लेखक व राजकारणी मातृभाषेबद्दलच्या त्यांच्या प्रेमाचा टेंभा पुन:पुन्हा

मिरवितीलही इंग्रजी व इतर कोणत्याही भाषेचा आक्रमणाविरोधात उभे राहून मातृभाषेच्या सन्मानाचे रक्षण करण्याच्या शपथाही घेतील पण आपली सार्वजनिक भूमिका आणि वैयक्तिक आयुष्य यात दिवसेंदिवस अधिकाधिक तफावत होत चाललेली आहे हे सत्य आपण कसे नाकारणार! दुटप्पी बोलणे आणि दुटप्पी दर्जा ह्याचे गारुड आपल्यावर चालून येणार असेल तर आपल्या मराठीचे भवितव्य तरी काय असणार ! उच्चभू मराठी लेखकात हे चित्र आढळून येत असल्याकडे जरी आपण दुर्लक्ष केले.तरी निम्न स्तरावर जगणाऱ्या सामान्य माणूसही भीक मागेल,पैसे उसने घेईल परंतु आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यासाठी धडपडतोच ना!

जितके जास्त तुम्ही स्वत:ला विशिष्टवर्गीय मानाला तितकी तुम्हाला उणेपणाची भावना अधिक जाणवेल.भाषा लेखकांना आपण एक्लिवझिव्ह वर्तुळाच्या बाहेर आहोत हे जितक्या जास्त तीव्रतेने जाणवले.तितके जास्त ते स्वत:ला कमकुवत समजू लागतील आणि स्वत:बद्दल आपण अधिकच अतिविशिष्ट वर्गीय असल्याचा ग्रह करुन घेऊ लगतील.

जी भाषा संवादाचे माध्यम म्हणून वापरली जाते तिचा उपयोग बहिष्कृत करण्याचे हत्यार म्हणून होतो हे जर आत्मविरोधी वाटत असेल तर तीच भाषा अडवणुकीचे माध्यम म्हणून वापरली.जाते ही बाब विपर्यासाची पराकाष्ठा ठरते.इथे महासागर ओलांडण्याची काही गरज नाही.

आपले घरातच ते चालले आहे.भाषिक राजकारणासाठी केरळ,तामिलनाडू येथील लोक एकेकाळी आपल्याला नकोसे झाले होते.आणि बिहारी लोकांचा आपल्याला इतका तिटकरा वाटला की त्यांना महाराष्ट्र सोडवा लागला.आपला मराठी माणूस इतका कसा कोत्या मनाला बनला!

लेखक विदर्भाचा,मराठवाड्याचा, कोकणातला, खानदेशातला,पश्चिम महाराष्ट्रतला आहे याने काही फरक पडत नाही. लेखक चांगला आहे.की टुकार हाच निकष असायला हवा.टी.व्ही.वरील चलचित्रे,इंटरनेट,मोठा पडदा,सेलीब्रिटी जर्नालिझम,फेसबुक,सेलफोन,मॅसेजिंग आणी रेडिओ गेम्स या सगळ्यांमुळे मराठी साहित्य पर्यायाने मराठी भाषा या भूततलावरील एका संकटात सापडलेली प्रजाती बनून राहिल असे एकूणच आगामी संकटाची चाहुल सांगते.महाराष्ट्रीय भाषेत लिहिणाऱ्या लेखकांना या गोष्टीचे आकलन होणार नसेल तर अनिच्छेने का होईना त्यांना आत्मनाश हा ओढवून घ्यावाच लागेल.तर आपल्याला मराठी साहित्याची/भाषेची खरोखरच कदर असेल तर हास्यापद,कमालीचे निरुत्पादक,परस्पर विघातक भांडणं,गटबाजी व भाषिक राजकारक तात्काळ थांबविले पाहिजे.आपली उर्जा नाना क्षेत्रातील विविध विषयांवरील वेधक गद्य/पद्य लिहिण्यासाठी खर्ची घातली पाहिजे.जगातील शास्त्रीय विषयावरील साहित्याच्या अनुवादाकडे मोठ्या प्रमाणावर वळण्याचीही गरज आहे.त्यासाठी मराठी लेखकाने आपला विविध क्षेत्रातील वाचनसंसार वाढविला पाहिजे.जेणेकरुन पळून चाललेल्या वाचकांच्या झिंज्या पकडून त्यांना आपण पुन्हा शब्दांकडे आणि पुस्तकांकडे खेचून आणू शकू.

आपण किती सुदैवी आहोत,आपल्याजवळ चौपन्न बोलीभाषांचा खजिना आहे.इतर कोणाहीपेक्षा लेखकाचे भाषेशी मोठं जिव्हाळ्याचं नातं असतं.तेच तिचे पूजक असतात.लेखक शब्दांना नवीन वळणे,नवे आकार देऊ शकतात.तेच भाषेला असाधारण संदर्भात वेगवेगळ्या पध्दतीने वापरु शकतात.आपल्या भाषेला बंधने घालणाऱ्यांच्या विरोधात लेखक मंडळीनी एक मोठी सैन्याची फळी उभी करायला हवी त्यातून पुढच्या पिढ्यांसाठी मराठी भाषेचे जतन शक्य होईल.

९९३००३११४८

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक –शैला नंदकिशोर हजारे Reg No.

वास्तव

# नवे वर्ष,नवे आयाम,नवे परिमाण...



डॉ.विजय पांढरीपांडे
हैद्राबाद

एकविसाव्या शतकाचे एकविसावे वर्ष संपले आहे.२०१९ साली सुरू झालेले कोरोना विषाणूचे जागतिक संकट संपेलेले नाही.एक संपलेले की दुसरेच अशी संकटाची मालिका सुरूच आहे.हा फक्त मांणसाच्या वैयक्तिक आरोग्याचा प्रश्न राहिलेला नाही.उद्योग,शिक्षण, पर्यावरण, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात आजारपण आले आहे.इथे तक्रारीला अर्थ नाही.एकमेकांना दोष देण्यातही अर्थ नाही.प्रश्न आहे पुढे जाण्याचा!आहे त्या परिस्थतीत मार्ग शोधण्याचा.जग थांबलेले नाही.ते थांबणारही नाही. माणसाने बुद्धीच्या आध्यात्मिक शक्तीच्या जोरावर यापूर्वी देखील अनेक संकटांवर मात केली आहे. पूर्वीच्या तुलनेत नवनवे तंत्रज्ञान आपल्या मदतीला आहे,ही केवढी जमेची बाजू! कल्पना करा,इंटरनेट कमुनिकेशन,वाय फाय ,स्मार्ट फोन नसते तर काय झाले असते ? ऑनलाइन प्रक्रियेत पूर्णत्व नसेल.कमतरता असेल.पण तरीही या गेल्या दोन वर्षात बरेचसे उद्योग,शिक्षण यंत्रणा,दळणवळण ,संवाद,हे सारे या यंत्रणेच्या बळावरच सुरू आहे.आरोग्य क्षेत्रातही अँपच्या माध्यमातून या काळात युद्ध पातळीवर चांगले काम झाले.कसेतरी का होईना पण शिक्षण चालू राहिले.आता तर कृत्रिम बुद्धीमत्ता , इन्फो बायो नॅनो तंत्रज्ञानाचे संलग्निकरण, संगणकाची वाढती क्षमता असे नवनवे तंत्रज्ञान जोमाने पुढे येते आहे.ज्यामुळे जगाचा चेहरामोहराच येत्या दोन तीन दशकात बदलणार आहे.कोणत्याही तंत्रज्ञानाचे जसे फायदे असतात तसे तोटे देखील असतात.विज्ञान तंत्रज्ञानाच्या बाबतीत अंतिम शाश्वत असे काही नसते.कालची थिअरी आज चुकीची ठरते.प्रत्येक नवा दिवस वेगळा असतो.हे सातत्याने होणारे बदल आपण स्वीकारले पाहिजेत.आत्मसात केले पाहिजेत.

शिक्षणाच्या संकल्पना आता बदलाव्या लागतील.दहा ते पाच शाळा/ कॉलेज ही परंपरा बदलणार. तज्ञ लोकाचे मार्गदर्शन घ्यायचे तर वेळेचे बंधन झुगारून सकाळी,रात्री देखील वर्ग घ्यावे लागतील.परदेशातील तज्ञ देखील मदत करतील त्याच्या वेळा सांभाळल्या तर..मूल्यमापनाच्या नव्या पद्धती शोधाव्या,स्वीकाराव्या लागतील.तीन तासांचा,शंभर मार्काचा पेपर,एका तासाचे पन्नास गुणाचे प्रॅक्टीकल अमुक गुण पासिंग,ग्रेस मार्कांचे अनुदान.या शाळा कॉलेजच्या साचेबद्ध चौकटीतून बाहेर यावे लागेल.मुख्य म्हणजे शिकविण्यापेक्षा शिकणे शिकवावे लागेल. स्वयं अध्ययनासाठी विद्यार्थ्यांची मनोवृत्ती घडवावी लागेल.त्यासाठी शिक्षकाची भूमिकाच बदलावी लागेल.पालकांनी देखील आपली विचारसरणी बदलायला हवी.उद्योगाच्या,करीयरच्या भविष्याच्या गरजा आता पार बदलल्या आहेत.तोच तो जुना पुराणा अभ्यासक्रम,तीच ती शिकविण्याची पद्धत कामाची नाही.आजचे अर्धे अधिक अभ्यासक्रम हे कालबाह्य,कुजकामाचे ठरणार आहेत.येत्या दशकात लाईफ लाँग लर्निंग हाच शिक्षणाचा,प्रगतीचा मूलमंत्र ठरणार आहे.वारे त्या दिशेने वाहायला लागले आहेत.

नीती अनीतीच्या संकल्पना ,जीवन मूल्ये,विवाह संस्था ,कुटुंब पद्धती,सामाजिक,राजकीय व्यवस्था यात सातत्याने

होणारे बदल आपल्याला स्वीकारावे लागतील.सध्या एकमेकांना दोष देणे,दुसऱ्याच्या चुका शोधणे, परस्परांचे पाय खेचणे,जाती धर्माच्या आधारावर द्वेष पसरविणे,यातच आपली शक्ती खर्च होतेय.विशेष करून ज्यांच्या हातात अधिकार आहेत, सत्ता आहे, ती मंडळी जास्तच भरकटलेली,माजलेली दिसतात.दारूची नशा केलेल्या,शुध्द विसरलेल्या,व्यक्ती सारखी बेधुंद अवस्था असते त्यांची!अशा मदांध व्यक्तीचा माज उतरावा लागेल.अनिर्बंध,असामाजिक,अविचारी वर्तन खपवून घेतले जाणार नाही असे दंडक निर्माण करावे लागतील.

हा बदल एकाएकी होणार नाही.पण तो मंद गतीनेही होता कामा नये.जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे तर रांगुन चालणार नाही. अक्षरशः धावावे लागेल. एकट्याने नव्हे,सर्वांनी मिळून. हातात हात घालून.महासत्ता वगैरे होण्यापेक्षा आत्मसत्ता जास्त महत्वाची.स्वतःचे उन्नयन,स्वतःवर नियंत्रण स्वत:त बदल जास्त महत्वाचे.जगाची चिंता नको.जगातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने बदलला की,जग आपोआप बदलेल.आय मध्ये इलनेस,आजारपण,विकृती आहे तर वुई मध्ये वेलनेस! आपल्या बरोबरच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त इतरांचा विचार आहे.शेवटी विकास - विकास म्हणजे तरी काय? सर्वांचे सुख, सर्वांचा आनंद.

प्रत्येक क्षेत्रात नीती नियम आहेत.ते इतरांनी पाळावे,आम्ही पाळणार नाही,अशी मग्रुरी,बेशिस्त चालणार नाही.ती शासनानेच नव्हे तर समाजाने देखील खपवून घेता कामा नये.या बेशिस्तीतूनच बेदीली निर्माण होते.अतिरेकी, समाजकंटक निर्माण होतात.शिस्त,शांतता ही सर्वांनी समान पद्धतीने समान पातळीवर अंगीकारायला हवी.एरवी सामाजिक गोंधळाला वाव मिळतो.राजकारणी मंडळींना हेच हवे असते. डिव्हाईड अँड रुल हे त्यांचे तत्व!या बेशिस्त,मुजोर राजकारण्यांना वठणीवर आणण्याचे कामही समाजालाच करायचे आहे.दुसऱ्या कुणावर अवलंबून,दुर्लक्ष करून चालणार नाही.

यापैकी काही गोष्टी व्यक्तीवर अवलंबून असतात तर काही समूहावर अवलंबून असतात.काहीवर आपले नियंत्रण असते,काही गोष्टी आपल्या कक्षेबाहेर असतात.हे बदलते वारे नीट समजून घेणे गरजेचे आहे.हेच खरे शिक्षण.विद्यापीठात पदवी मिळते.पदवीदान होते! शिक्षण,ज्ञान कितपत मिळते हा वादाचा,चर्चेचा विषय!यापुढे स्वयं अध्ययन, स्वयं शासन , स्वयंपूर्ण यासाठी स्वतःला तयार करावे लागेल.

काही प्रश्नाचे एकमेव,युनिक उत्तर असते. काही प्रश्नांची अनेक उत्तरे असतात.पण गेल्या दोन वर्षात आपण सारे नवीन गोष्ट शिकलो.ती ही की काही प्रश्नांना उत्तरे नसतात!आपल्याला आहे ते,जैसे थे स्वीकारावे लागते.ही नवी शिकवण आता आपण अंगिकारली पाहिजे.

गेल्या दोन वर्षाच्या परिणाम स्वरूप,अन् येत्या दशकातील तांत्रिक बदलामुळे आपल्याला मानसिक आरोग्याकडे, शारीरिक आरोग्या पेक्षाही जास्त लक्ष द्यावे लागेल. डॉक्टरांचे व्यापारिक सल्ले बाजूला ठेवले तर आपले शारीरिक आजार हे खरे मानसिक आजारच असतात. शिक्षणव्यवस्थेतील मरगळ,परिणाम स्वरूप भविष्यातील करियर विषयीची चिंता,सारखे घरात कोंडून राहिल्यामुळे आलेले नैराश्य, ज्याचे पोट-पाणीच घराबाहेर निघण्यावर अवलंबून आहे अशा कामगार,कलाकार ,अत्यावश्यक सेवार्थी यांची झालेली होरपळ याचा एकत्रित परिणाम आपल्या सर्वांच्या मानसिक आरोग्यावर होणार आहे.याचे उत्तर डॉक्टर जवळ नसणार.ते तुझे आहे तुजपाशी या न्यायाने आपल्या जवळच आहे.कौटुंबिक नात्याला नवे आयाम,परिमाण देणे,सोशल डिस्टन्स सांभाळून एकमेकाशी सुसंवाद साधणे,चर्चेतून समस्या जाणून त्यावर मिळून उपाय शोधणे,परस्परांना मदत करणे, एकमेकाची विचारपूस करणे,हे सगळे आपल्या संस्कृतीचाच अविभाज्य भाग असलेले संस्कार नव्या रंगरूपात जपावे लागतील.अध्यात्म हे केवळ धर्माशी संबंधित नाही.मनाचे विचार, विकार धर्मानुसार बदलत नाहीत.पण योगा,प्राणायाम, आसने, अध्यात्म ग्रंथाचे ,अन् इतरही आवडीचे वाचन ,याद्वारे आपण आपले मानसिक आरोग्य सांभाळू शकतो.त्यासाठी इतरांनाही मदत करू शकतो.इथे ज्येष्ठांची , शिक्षक/ प्राध्यापकाची भूमिका महत्वाची ठरते.मुले मोठ्यांचे नीट शब्दात सांगितले तर ऐकतात. शिक्षकावर विश्वास ठेवतात. या विश्वासात श्रध्दा देखील असते.या बाबतीतले नीती नियम

कुठल्याही पुस्तकात लिहिले नसतात.मार्गदर्शक तत्वे आहेत.त्याच्या आधारे आपणच आपल्या घरी,कुटुंबात प्रयोग करू शकतो.खचलेल्या मित्रांना,सहकार्यांना मदत करू शकतो.प्रत्येकाची समस्या वेगवेगळी असू शकते.त्यामुळे एक प्रयोग दुसऱ्यावर यशस्वी ठरेलच असे नाही.चुका करत करतच आपण शिकू शकतो.किंबहुना धडपडत, खरचटत,झगडत,यशाचा टप्पा गाठण्यात जो आनंद असतो,तो अवर्णनीय असतो.आपण युरेका,युरेका असे आनंदाने ओरडू शकतो!

२०२० हे वर्ष माईल स्टोन म्हणून वापरले गेले होते.डॉ कलामा सारख्यानी मिशन २०२० अंतर्गत नव्हे संकल्प आखले होते.पण दुर्दैवानं विषाणूच्या आपत्कालीन परिस्थिती मुळे सारे ताळतंत्र बिघडले. आता आपण अशा आपदासाठी तयार राहायला पाहिजे.यापूर्वी देशा देशातील युद्ध फक्त सीमेवर लढले जात होते.ठराविक शस्त्रानीच लढले जास्त होते.आता यापुढे ही युद्ध घरबसल्या तंत्रज्ञानाने लढली जातील. त्यांचे दृश्य परिणाम दिसणार देखील नाहीत.त्यासाठी चे सायरन देखील वाजणार नाहीत. येणाऱ्या संकटासाठी नेहमी सज्ज राहा हा नवा संदेश गेल्या वर्षाच्या अनुभवाने आपल्याला दिल! आहे.या एकूणच परिस्थितीकडे संयमाने,शांत चित्ताने,सकारात्मक दृष्टीने बघितले तर यातूनही मार्ग निघू शकतील.नव्हे निघतीलच.आपल्याला जरा हिमतीनं घ्यावे लागेल एवढेच.त्यामुळे काळजीचे कारण नाही.आपण नव्या वर्षाचे आधीच्याच जोमाने स्वागत करायला हरकत नाही.

**(डॉ.विजय पांढरीपांडे हे मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत)**

**७६५९०८४५५५**

## माझी कविता

### आईसमान मानतो मराठी

नमो मातृभाषा नमन घे मराठी
नवे गीत माझे आज तुझ्यासाठी ।।
तुझ्या अंगणात ज्ञानोबा तुकाई
चोख्या नाम्या संगे खेळली जनाई
अभंग नि ओव्या, लावणी अंगाई
स्फुरले पोवाडे शिवशंभू साठी
आहोभाग्य माझे बोलतो मराठी ।।
पदरी तुझ्या ग बहू बोलीभाषा
गोडी अमृताची मिटवते द्वेषा
तुझ्या ग संवादे मिटे भेद-रेषा
कंठातून माझ्या शब्द येई ओठी
हसावी मराठी बोलावी मराठी ।।

रंक असो कोणी असो कोणी भूप
रुजो मनामनात तुझे शब्द खूप
हसो कणाकणात अभिजात रूप
रूप गंध छंद लाभला मराठी
आईसमान मानतो तुला मी मराठी ।।
नमो मातृभाषा नमन घे मराठी
अहोभाग्य माझे बोलतो मराठी ।।

**किरण डोंगरदिवे**
मेहकर-बुलडाणा

# झिरो बजेट - मुंबई दर्शन सहल!



अरुण पाटील
जळगाव

'बिनभिंतीची उघडी शाळा लाखो इथले गुरू,
झाडे, वेली, पशु, पाखरे यांशी गोष्टी करू.'

कविवर्य ग. दि. माडगूळकर यांच्या कवितेतल्या या ओळी अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व सांगून जातात. दैनंदिन अध्ययन-अध्यापना बरोबरच विद्यार्थ्यांना शालेय वातावरणाच्या बाहेर जाऊन, पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रमाच्यापलीकडे जाऊन आधुनिक जगाची ओळख व्हावी, त्यांच्या ज्ञानात भर पडावी, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास व्हावा या हेतूने शैक्षणिक सहल या उपक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांची सहल मुंबई दर्शन करण्यासाठी मुंबईला घेऊन जावी अशी चर्चा मी माझे सहकारी शिक्षक प्रतिभा अशोक बाविस्कर, सचिन हिलाल पाटील, अमर मोसम बरडे, अमोल जयवंतराव बागल यांच्याशी केली. या सर्व ध्येयवेड्या शिक्षक सहकाऱ्यांनी देखील विद्यार्थ्यांची मुंबई दर्शन सहल घडवून आणावी असा ठाम निर्धार केला. सहलीसाठी प्रतिविद्यार्थी साधारणपणे १२०० रुपये खर्च येणार होता. ग्रामीण भागातील गरिबीची परिस्थिती व निसर्गाच्या लहरीपणामुळे पडणारा दुष्काळ यामुळे पालक परीक्षेची फी भरायला तयार होतील हे थोडसं अशक्यप्राय आव्हान आमच्यासाठी होतं.

सहलीचा विषय मांडण्यासाठी व नियोजन करण्यासाठी प्रथमतः आम्ही शाळा व्यवस्थापन समितीची सभा आयोजित केली. सदर सभेत मुंबई दर्शन सहलीचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर पालक सभा आयोजित करून पालकांना सहलीची व येणाऱ्या खर्चाची कल्पना दिली. परंतु ठराविक पालकांनीच सहलीस होकार दिला. आर्थिकदृष्ट्या काही पालकांना सहल न पेलवणारी



होती. अशातच पिरबाबाची व महादेवाची दोन दिवस भरणारी गावची यात्रा जवळ आली. यात्रेच्या निमित्ताने मुंबई पुणे येथे नोकरी व्यवसायानिमित्त स्थायिक असलेले माजी विद्यार्थी गावात आले. त्यांच्यापैकीच प्रवीण बळीराम पाटील यांच्याशी आमची भेट झाली. त्यांच्यासमोर आम्ही मुंबई दर्शन सहलीचा प्रस्ताव मांडला शिवाय त्यांना येणाऱ्या अडचणी व खर्चाची जाणीव करून दिली. चर्चेअंती त्यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, आम्ही आमच्या शालेय वयात आमची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे सहलीला जाऊ शकलो नाही. तशी वेळ माझ्या गावातील विद्यार्थ्यांवर

येऊ नये म्हणून मी स्वतः व माझे मित्र श्री राजाराम भगवान पाटील आम्ही तुम्हाला सहलीसाठी प्रति १०००० रुपये याप्रमाणे रुपये २०००० देऊ करतो. असे सांगितल्याप्रमाणे त्यांनी तात्काळ पैसे दिले. यामुळे आमच्या पंखात निश्चितच बळ आले होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश नगराज पाटील, उपाध्यक्ष संजय शिवलाल परदेशी व ग्रामस्थ जयराम बाबुलाल पाटील यांनी आणखी चार माजी विद्यार्थ्यांशी संपर्क करून सहलीचा संपूर्ण खर्च लोकसहभागातून करण्याची शाश्वती दिली. आणि त्याप्रमाणे संजय हेमराज पाटील १५००० रुपये,शांताराम फकीरा बोरसे १०००० रुपये, विजय दिनकर पाटील ७५०० रुपये, उत्तम भास्कर सूर्यवंशी ५००१ रुपये एवढी देणगी सहलीसाठी आम्हाला तात्काळ मिळाली. यात भर पडावी म्हणून शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक तसेच काही पालकांनी मिळून १०००० रुपयांची देणगी सहलीसाठी जमा केली. आता मात्र सहलीला आवश्यक संपूर्ण १००% खर्च आमच्या हातात आला होता. एकूण ६७५५१ रुपये सहल देणगी आमच्याकडे जमा झाली. आम्ही सर्वजण मोठ्या उत्साहाने सहलीच्या नियोजनासाठी कामाला लागलो. ३ महिने आधी रेल्वेचे आरक्षण तिकीटे आम्ही बुक केलीत.

पालकांच्या परवानगीने इयत्ता तिसरी व चौथीचे एकूण ४० विद्यार्थी, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी व पालक असे एकूण ६० जण आम्ही सहलीला जाणार होतो. सहलीची तारीख निश्चित केली. सर्व विद्यार्थ्यांचा, पालकांचा आणि आम्हा सर्व शिक्षकांचा उत्साह दिवसेंदिवस वाढत होता. आम्ही सहलीच्या तारखेची उलट गणती करत होतो. बघता बघता सहलीचा दिवस उजाडला. आणि आम्ही अमृतसर मुंबई एक्सप्रेसने सहलीला निघालो. मुंबई दर्शन सहलीदरम्यान आम्ही गेटवे ऑफ इंडिया, ताज हॉटेल, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, तारापोरवाला मत्स्यालय, गिरगाव चौपाटी, नेहरू तारांगण सेंटर, कमला नेहरू पार्क, हँगिंग गार्डन, वरळी सी लिंक सफर, महालक्ष्मी मंदिर, स्वामीनारायण मंदिर, सिद्धिविनायक मंदिर, मुंबई महानगरपालिका मुख्यालय, सीएसटी रेल्वे स्टेशन, इत्यादी ठिकाणांना भेट दिली. विद्यार्थ्यांनी सहलीचा परमोच्च आनंद घेतला. मुलांना यामुळे कुटुंबातील सदस्यांपासून दूर राहणे, स्वयंशिस्त ठेवणे, स्वतःचे काम स्वतःच करणे इ. बाबींची प्रत्यक्षात अनुभूती मिळाली. मुंबई या ठिकाणी नोकरी करणारे दिपक मधुकर पाटील यांनी सहली दरम्यान विद्यार्थ्यांना केळी, सफरचंद, शुद्ध पाणी, नाश्ता पुरवले. तसेच गोपाल संतोष पाटील यांनी देखील सहलीच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. शांताराम बोरसे यांनी सिद्धिविनायक मंदिराचा प्रसाद सर्व विद्यार्थ्यांना वाटप केला. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक शुल्क न घेता ही सहल आयोजित केल्यामुळे खऱ्या अर्थाने मुलांसाठी ही झिरो बजेट शैक्षणिक सहल ठरली. या सहलीमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रथमच रेल्वेच्या स्लीपर कोच मध्ये प्रवास केला. लिफ्टमध्ये बसण्याचा व रेल्वे स्टेशनवरील वर खाली नेणारा फिरत्या जिन्याचा अनुभव घेतला. सहलीत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील सुखद भाव पाहून आम्हा शिक्षकांना खूप समाधान वाटत होते. ही शैक्षणिक सहल आम्हा सर्व शिक्षकांसाठी नवचैतन्य देणारी ठरली. शिक्षक, पालक व ग्रामस्थ यांच्या समन्वयातून ही झिरो बजेट शैक्षणिक सहल यशस्वी ठरली; कारण सहकाराशिवाय उद्धार नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक जगाची ओळख करून देणारी, सर्वांचे आकर्षण असलेली व जगाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई दर्शन सहल विदयार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात खूपच भर पडली. आमच्या जि. प. प्राथमिक शाळा पिंपळगाव येथील मुंबई दर्शन सहल; भूमिपुत्रांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाली. म्हणून आमच्यासाठी व इतर शाळांसाठी ही सहल नक्कीच प्रेरणादायी व उर्जादायी ठरली.

**(अरुण शिवाजी पाटील हे जि.प.शाळा पिंपळगाव बु। ता.भडगांव जि.जळगाव येथे कार्यरत आहे.)**

९४०३८०७६९३

जडण घडण

# यशाची एकेक पायरी चढतांना...



**किशोर माळी**
दोंडाईचा-धुळे

ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रात कसा वळलो याचा विचार जेव्हा करतो, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर आज ज्या संस्थेत काम करत आहे, त्या संस्थेचे चेअरमन कैलासजी कांतीलालजी जैन यांची प्रतिमा सदैव डोळ्यासमोर उभी असते. मी ज्या क्षेत्रात ( ग्रंथपाल पदावर ) काम करत आहे. त्या क्षेत्रात काम करत असतांना स्वत :ला खूप भाग्यवान समजतो. कारण काम करत असतांना विद्यार्थांना, शिक्षकांना व पालकांना वाचनासंबंधी माहिती पुरवित असतांना अतुलनीय आनंद मिळतो. नोकरी करीत असतांना ग्रंथालय या क्षेत्रात करियर घडविण्याची संधी मला शाळेचे चेअरमन कैलासजी कांतीलालजी जैन यांनी दिली.

२०१० या वर्षी बारावी विज्ञान या शिक्षणावर दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील सर्वदूर नावलौकिक प्राप्त इंग्रजी माध्यमाची शाळा हस्ती पब्लिक स्कूल येथे लॅब असिस्टंट या पदावर रुजू झालो. सुरवातीला एक वर्ष केवळ लॅब असिस्टंट म्हणून मी शाळेत काम पाहिले. नंतर एक वर्ष झाल्यावर संस्थेने माझ्यावर शाळेचे ग्रंथालय सांभाळण्याची जबाबदारी सोपवली. सुरवातीला अंदाजे अडीच हजार पुस्तके आमच्या शाळेच्या ग्रंथालयात होती. ग्रंथालयाचे काम दिल्यावर सायन्स लॅब आणि ग्रंथालय हे दोन्ही विभाग मी सांभाळू लागलो. सायन्स लॅबला शिक्षक प्रयोग घ्यायचे तेव्हा वर्गनुसार प्रयोगवहीतून त्यांना जे साहित्य लागायचे ते काढून द्यायचो. ग्रंथालयातही पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थांना आठवड्यातून एक तासिका ग्रंथालयासाठी दिलेला होता. या तासिकेत मी प्रत्येक विद्यार्थाला त्याच्या आवडीचे पुस्तक आठ दिवसांसाठी वाचण्यासाठी घरी द्यायचो.त्या सर्व विद्यार्थांचे देवाण -घेवाणाची नोंद ठेवू लागलो.आजही ग्रंथालयाच्या या तासिका नियमित शाळेत



चालू आहेत.पण ज्या वेळेस संस्थेने नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी खरेदी केले, तेव्हा मला त्या पुस्तकांची नोंद ग्रंथालयाच्या दाखलनोंदवहीत कशी करायची?हे जमत नव्हते. कारण त्या वेळेस माझे ग्रंथालय शास्त्रातील शिक्षण न झाल्यामुळे मला नवीन आलेल्या पुस्तकांची नोंद करण्यास समस्या निर्माण होऊ लागली. तेव्हा मी शाळेचे चेअरमन कैलासजी जैन यांना माझी अडचण सांगितली. तेव्हा त्यांनी मला ग्रंथपाल या क्षेत्रातील शिक्षण घे, असा सल्ला दिला. त्यानुसार नंदुरबार येथील टिळक वाचनालयात मी १२ वी नंतरचा ग्रंथपाल पदाचा तीन महिन्याचा एलटीसी कोर्स पूर्ण केला.कोर्समुळे ग्रंथालयासंबंधी ज्या प्राथमिक बाबी आहेत,त्या बऱ्यापैकी समजल्या

नंतर याच क्षेत्रातील पदवी घेऊन सखोल माहिती मिळावी म्हणून बी. लिब. करण्याचा विचार आला. मात्र त्यासाठी कोणत्याही क्षेत्राची पदवी आवश्यक असल्याने मुक्त विद्यापीठातून बी.ए. पूर्ण केले. पदवी पूर्ण झाल्यावर धुळे येथील एस. एन. डी. टी. महाविद्यालयात बी. लिबसाठी प्रवेश घेतला. बी. लिब. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यावर ग्रंथालय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी एम. लिब. करण्याचा विचार सुरू झाला. पण त्यावेळेस धुळे आणि नंदुरबार यापैकी कुठेच एम. लिब. या अभ्यासक्रमाची सोय नव्हती. म्हणून जळगाव येथील एम. जे. महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे मुक्त विद्यापीठाचे एम. लिब. असल्याने दर रविवारी या अभ्यासक्रमाचे क्लास व्हायचे. प्रत्येक रविवारी सकाळी माझ्या गावाहून म्हणजे जयनगर ता. शहादा येथून दोंडाईचा येथे जाऊन अहमदाबाद – हावडा या एक्सप्रेसने जळगाव येथे जाऊन एका वर्षाचा एम. लिबचा अभ्यासक्रम प्रथम श्रेणीत पूर्ण केला.

एम. लिब. पूर्ण झाल्यावर ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रातील प्राध्यापक पात्रता परीक्षा द्यावयाचे ठरविले. पहिल्या तीन प्रयत्नात मला प्राध्यापक पात्रता परीक्षेत यश मिळाले नाही. मात्र चौथ्या प्रयत्नात जुलै २०१८ मध्ये राष्ट्रीय पात्रता परीक्षा ( नेट )पास झालो. याच दरम्यान राज्य पात्रता परिक्षाही आपण उत्तीर्ण व्हावे, अशी अपेक्षा मनात होती. पुन्हा या क्षेत्रातील नवीन पुस्तकांचा अभ्यास करून २०१९ साली मी राज्य पात्रता परीक्षाही ( सेट ) पास



झालो. केवळ १२ वी विज्ञान या शिक्षणावर लॅब असिस्टंट म्हणून नोकरी करत असतांना आज ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रातील नेट आणि सेट या दोन्ही पात्रता परीक्षा पास झालो आहे. यामागचे श्रेय केवळ आमच्या शाळेचे चेअरमन कैलास जैन यांनाच जाते. कारण त्यांनी मला सायन्स लॅब सांभाळण्यासोबत ग्रंथालय सांभाळण्याची संधी दिली म्हणून मी नेट –सेट परीक्षा पात्र होण्यापर्यंत पोहचू शकलो. म्हणून मी आदरणीय कैलासजी जैन यांचा शतश: ऋणी राहिल.

आज आमच्या हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यू. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात २७ हजारापेक्षा अधिक पुस्तके आहेत. मुलांना व शिक्षकांना सेवा देत सर्व पुस्तकांची एन्ट्री दाखलवहीत व संगणकावर केल्याचा मनस्वी आनंद आहे.या क्षेत्रात मी माझे करियर घडवत असतांना विविध मासिके तसेच पुस्तकांमध्ये शोधनिबंध व लेख प्रकाशित झाले आहेत.या ग्रंथालय क्षेत्रात काम करत असतांना एक वेगळाच आनंद स्वत:ला मिळत आहे.करियर घडवण्यामागे ज्या व्यक्तीचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य मला लाभले आहे, त्यांच्याविषयी मला आलेले अनुभव थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला.

**( किशोर रामदास माळी हे ग्रंथपाल म्हणून हस्ती पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात दोंडाईचा ता.शिंदखेडा जि.धुळे येथे कार्यरत आहे.)**

९७६७७५२२१२

# उपक्रमांनी लावला शाळेचा लळा!



युवराज माने
परभनी

सर,आज तुम्ही काय मस्त शिकवले आम्हाला!, खूप मज्जा आली. मुलांच्या या प्रतिसादाने मी गेल्या अनेक वर्षांपासून अंतर्बाह्य उजळून निघत आहे... याचं सर्व श्रेय आम्ही शाळेत राबवत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांना जातं.उपक्रम कोणते तर,जशी परिस्थिती येईल त्यावर उपाय म्हणून जी कृती आम्ही करत गेलो तीच कृती पुढे उपक्रम बनत गेली.तीन-चार तांड्यावरून येणारी मुलं,नियमित शाळेत यावेत यासाठी आम्ही सदैव तत्पर होतो.कौटुंबिक परिस्थितीमुळे ऊस तोडीला जाणाऱ्या मुलांची संख्या भरपूर होती.शाळेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला अन पालकांचं शाळेविशी मतपरिवर्तन झालं.गावकरी शाळेकडे माणूस निर्मिती केंद्र म्हणून पाहू लागले.आता मुलांना शाळेत रमवावं हे महत्वाचे काम आमच्यासमोर होतं.

शाळेपासून दूर ऊसाच्या फडात, शेळ्या मेंढ्याच्या मागे रमणाऱ्या लेकरांच्या मनांत रुजणं हे एक मोठं आव्हान होतं. हळूहळू वेगवेगळे उपक्रम राबवायला सुरुवात केली तसतसे एकेक चिमुकलं मुल आमच्या सोबत रमू लागलं.आनंदाची झाडं ब ह रु लागले.

**मला बोलू द्या-** परिपाठात प्रत्येक वर्गातील एका मुलास त्याच्या आवडीच्या त्याने तयार केलेल्या विषयावर मनमोकळेपणानं मनसोक्त बोलण्याची संधी दिली जाऊ लागली.यातून ते मुल अभिव्यक्त होवू लागलं.मलाही बोलता येतं,माझंही कोणीतरी ऐकून घेत आहे असा आत्मविश्वास लेकरांना येऊ लागला.शाळेत प्रत्यक्ष शिक्षण रुजू लागलं.

**प्रश्न आमचे ; उत्तर तुमचेः -** लहान मुलांना वेगवेगळे प्रश्न पडत असतात. त्या प्रश्नांची उत्तर मात्र त्यांच्याकडे नसतात.अशा प्रश्नांची उत्तरं गुरुजींनी मुलांना द्यायची



असतात.म्हणून परिपाठाच्यावेळी मुलांनी गुरुजींना प्रश्न विचारावेत.त्या प्रश्नांची उत्तरं गुरुजीनी विस्ताररूपाने मुलांना द्यावेत असं ठरलं व प्रश्नांची फैरी सुरू झाल्या.अनेक भन्नाट प्रश्न समोर येऊ लागले.गुरुजी व मुलं दोघेही ज्ञान समृद्ध होऊ लागली।

**थीम फलक-** शाळेच्या दर्शनी भागावरील फलकावर रोज वेगवेगळी थीम दिल्या जावू लागली.त्यावर मुलांनी स्वतः लिहून आणायचं व आपल्या वर्ग शिक्षकांना दाखवायचं असं ठरलं.त्यानुसार यातून मुलांचे लेखन



कौशल्य समृद्ध होऊ लागलं.मुलं रोज एका विषयाची आतुरतेने वाट पाहू लागले.

चालता-बोलता – दूरदर्शनवरील चालता-बोलता हा कार्यक्रम मुलं आवर्जून पाहत होते.हे आम्हाला माहित होतं.त्याला अनुसरूनच हा उपक्रम दर शुक्रवारी बालसभेच्या शेवटच्या टप्प्यात घेऊ लागलो.यात सर्व वर्गातील मुलं सहभागी होत होते. जणू काही टी व्ही वरील कार्यक्रम आपल्या शाळेत सुरू आहे की काय ? असं मुलांना वाटायचं.

**ज्ञानपोई –** दररोज दुपारी शाळेच्या दर्शनी फलकावर सामान्य ज्ञान आधारित पाच प्रश्न लिहिले जावू लागले. ते शाळेतील सर्व मुलं आपल्या वहीवर लिहून घेवू लागले. महिन्याच्या शेवटच्या दिवशी यावर आधारित स्पर्धा परीक्षा घेतली जावू लागली.परीक्षेत प्रथम तीन येणाऱ्या लेकरांना बक्षीस देऊ लागलो. यातून लेकरांना शाळेची आवड निर्माण झाली.व स्पर्धा परीक्षेची तयारी होऊ लागली.

**बालसभा –** अभिव्यक्त होणे ही मानवी गरज आहे. मुलांना मन मोकळं होण्याची संधी आम्ही सतत देऊ लागलो.अशीच संधी म्हणजे दर शुक्रवारी होणारी आमची बालसभा या बालसभेमध्ये बालसभेचे अध्यक्ष , प्रमुख पाहुणे मुलंचं निवडतात व बालसभेमध्ये मुलं एका विशिष्ट विषयावर सर्वासमोर मोकळे होतात. बालसभा म्हणजे मुलांचं अभिव्यक्तीचे प्रमुख ठिकाण बनलं.बाल सभा म्हटलं कि आनंद असं समीकरण बनलं.

लेखक आपल्या भेटीला – वेगवेगळ्या तांड्यावरू येणाऱ्या मुलांना विशिष्ट धाग्यामध्ये जोडणं,त्यांचं मन शाळेमध्ये रमवणं यासाठी उपक्रम आमच्या जोडीला उभी राहिले.त्यातीलच लेखक आपल्या भेटीला हा एक उपक्रम. परिसरातील लेखक-कवींना आम्ही शाळेत बोलून मुलांसोबत गप्पा गोष्टी करू लागलो.त्यातून मुलांना पुस्तकाबाहेरील गोष्टी समजू लागल्या.प्रत्येक महिन्यात दोन कवी व लेखकाना आम्ही बोलून मुलांसोबत त्यांचा संवाद घडवून आणू लागलो यातून मुलांना शाळेविषयीची गोडी लागली. बाहेरच्या जगात मुलांना प्रेवश मिळाला।

**वाचनाचा आनंदसोहळा –**दररोज जेवणाच्या सुट्टीमध्ये मुलांचे जेवण झाल्यानंतर मुलांना कथा, कविता किंवा एखाद्या विशिष्ट पुस्तक क्रमाने वाचून दाखवण्यात येऊ लागलं यातून मुलांना पुस्तक वाचनाची गोडी लागू लागली .पुस्तकाचं अभिवाचन केल्यानं मुलांना पुस्तकातील नवनवीन गोष्टी समजू लागल्या. आवडलेलया कथेविषयी अभिप्राय लिहून घेतल्या जाऊ लागला. वेगवेगळ्या पुस्तकांची मुलांना ओळख होऊ लागली. पुस्तक म्हणजे मजा असते अस मुलांच्या मनात पक्के होऊ लागलं.

**अमृतकण –** पुस्तकात आवडणारे वेगवेगळे विचार, सुविचार ,वाक्य मुलांना एका वहीत लिहिण्यास सांगितले.मुलं ते आवडीनं लिहू लागले.बघता-बघता सर्वच मुलांकडं अमृतकणांच्या वह्या तयार झाल्या. आता मुलं केवळ शाळेतच नाही तर आजूबाजूला परिसरातील चांगल्या वाटणाऱ्या गोष्टी त्या वहीमध्ये लिहू लागले.त्याचा उपयोग मुलं बोलण्यात, निबंध लिहिण्यात, कथा लिहिण्यात करू लागले.अमृतकण वेचणारे आमचे लेकरं राजहंस वाटू लागले.लेकरांना अमृतकणांची गोडीच लागली.

**शिदोरी –** आठवडाभरात वाचलेल्या पुस्तकांचा सारांश स्वरूपात मथळा एका विशिष्ट वहीमध्ये लिहून घेतल्या जाऊ लागला. पुस्तकाचे परीक्षण लेकरं उत्तम पद्धतीने करू लागले.आवडलेल्या पुस्तकाच्या लेखकांना मुलं पत्र लिहू लागली. या सर्व घटनांची एक फाईल बनवण्यात आली जिला शिदोरी नावाने आम्ही संबोधू लागलो.ही शिदोरी मुलांना पुढे जीवनभर उपयोगी पडणार होती यात शंका

नाही.अस आम्हाला माहित होतं.यामाध्यमातून लेकरांकडे जीवनभर पुरेल अशी शिदोरी मिळू लागली.

**पेनमित्र –** पाचवी ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील वेगवेगळ्या क्षेत्रात मोठमोठ्या पदावर असणाऱ्या व्यक्तींना पत्र लिहून मुलांचे मित्र बनण्यास भाग पाडले.त्यातून अनेक मान्यवरांनी लेकरांच्या पत्रास उत्तर देऊन लेकरांची मैत्री स्वीकारली. खेड्यातील प्राथमिक शाळेतील मुलं ते उच्च पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांचा अप्रत्यक्ष सहवास घडवून देता आला.त्यामुळे मुलं उद्याची नवनवीन स्वप्न पाहू लागले व शाळेची पटसंख्या वाढण्यास मदत झाली.मुलं शाळेत येऊ लागली.प्रत्येकाला वाटू लागलं माझा पण एक मित्र असावा .मला पण पत्र यावीत।

**चला कृतज्ञ होऊया –**कृतज्ञता हा अमूल्य संस्कार आहे.आठवड्यात ज्या लेखकांनी आपल्याला आनंद दिला,ज्ञान दिलं त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे मुलांना पटवून दिलं.अशा मान्यवरांना पत्र लिहून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणं सुरू झालं.यात महाराष्ट्रातील अनेक मान्यवर सहभागी झाले . सोबतच मुलं दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंगात या संस्कारच उदाहरण ठेवू लागले.सहजपणे मुलांमध्ये एक उत्तम संस्कार रुजवन झाली।

**अमृतकण वाटुया..–** शाळेतील सर्व मुलांकडे असणाऱ्या अमृतकणच्या वह्या आमच्यासाठी खऱ्या अर्थाने अमृतकण ठरू लागल्या आठवड्यातील एक दिवस शाळेच्या परिसरात मुलांना बसवून आठवडाभरातील जमा केलेले अमृतकण एकमेकांच्या वाचनास देऊन अमृतकणांची देवाण–घेवाण होऊ लागली यातून आपल्या मित्रांनी वेचलेली अमृतकण मुलांना घेता येऊ लागली.एकमेकांच्या ज्ञानाचा मुलांना उपयोग होऊ लागला .लेकरांच लेखन कौशल्यही विकसित होऊ लागलं .विचार करण्याची एक नवी दृष्टी लेकरांना मिळू लागली .

**शिवार भ्रमंती –** खेड्यापाड्यातील मुलांना आपल्या आजूबाजूच्या परिसराविषयी एक वेगळंच आकर्षण असतं.परिसरातील वेगवेगळ्या गोष्टी त्यांना रोज माहिती होतात पुस्तकाच्या बाहेर जाऊन स्वर्गातील माहिती करून घेणे यासाठी शिवार भ्रमंती म्हणून महिन्यातून एक दिवस




आम्ही शिवार भ्रमंतीस जाऊ लागलो. शिवार भ्रमंती दरम्यान मुलांना माती, पशुपक्षी नाले,ओढे याविषयीची माहिती सहजरित्या मिळू लागली.मुलांच्या आवडी प्रमाणे एक दिवस निसर्गाच्या सानिध्यात घालवला जाऊ लागला.यातून मुलं व गुरुजी याचं नातं ब ह रु लागलं.

**मुलाखत मान्यवरांची. –** वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या पदावर यशस्वी होऊन गेलेल्या मान्यवरांना शाळेत आमंत्रित केल्या जाऊ लागलं मुलांना यशाचे मार्ग सापडू लागले.आपणही असंच मोठं होऊया अशी प्रेरणा मिळू लागली.लेकरं आलेल्या पाहुण्यांची मुलाखत घेऊ लागली.मान्यवरांची संघर्ष कहाणी ऐकून मुलांना यशाची शिखरे खुणावू लागली.

**जिंकू–जिंकू –** अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांविषयी आम्हाला सदैव प्रश्न पडायचा अभ्यासात मागे राहणाऱ्या मुलांना कोणत्या पद्धतीने कोणत्या गतीने त्यांना शिकवावं? हा प्रश्न मला सतत भेडसावत होता परंतु हाही प्रश्न मुलांनीच सोडवला .शाळेतील अभ्यासात पुढे असणाऱ्या मुलांना मागे असणारं मूल दत्तक देऊन त्यांनाही आपल्या बरोबरीला आणण्यासाठी प्रेरित करण्यात आलं .केवळ आपणच नाही तर आपण सर्वजण जिंकूया असा बहुमूल्य संदेश मुलांच्या डोक्यात भरण्यात आला.अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांनाही आता सोबत घेऊन आम्ही पुढे जाऊ लागलो.

**क्षेत्रभेट –** अभ्यासक्रमात व्यवसायांची माहिती मुलांना पुस्तकातून मिळते परंतु प्रत्यक्ष भेट देऊन मुलांना शिकवली तर ती जास्त काळ स्मरणात राहते. नवीन ठिकाणी जायचं

म्हटलं की मुलं तत्पर असतात। पुस्तकातील संदर्भानुसार वर्गातील मुलांना क्षेत्र भेट म्हणून घेऊन जाऊ लागलो.यातून मुलांना परिसरातील व्यवसाय उद्योग त्याची माहिती होऊ लागली.

**वर्ग दैनंदिनी अहवाल –** पाचवी ते सातवी वर्गातील मुलांना वर्ग दैनंदिन अहवाल लेखनाचे काम देण्यात आलं.परिपाठा पासून ते शाळा सुटेपर्यंत घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना दररोज एका विद्यार्थ्याने वहीमध्ये लिहून घ्यायच्या व दुसऱ्या दिवशी सकाळी या दैनंदिन अहवाल वाचन वर्गात करायचा.वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला हे काम दिल्या जायचं त्यामुळे मुलांचे निरिक्षणशक्ती,लेखन कौशल्य वाढीस लागलं व इतरही मुलांना त्याची प्रेरणा मिळू लागली.यामाध्यमातून वर्गाचा वार्षिक अहवाल तयार होऊ लागला.

**उत्कृष्ट वाचक पुरस्कार –** वर्षभर वेगवेगळे वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण मुलांकडून लिहून घेतल्या जाऊ लागलं. जास्तीत जास्त पुस्तक वाचन केलेल्या, व पुस्तक परीक्षण केलेल्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार म्हणून निवडल्या जाऊ लागलं. शाळेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात येऊ लागलं.

मित्र माझा आरसा – आरसा कधीही खोटं बोलत नाही दिसेल ते प्रत्यक्ष दाखवतो।त्याप्रमाणे आपला मित्र हे आरशासारखा असावा , आपल्या मित्रात जे गुणदोष असतील ते प्रत्यक्ष मित्रांना सांगितले पाहिजे यासाठी मित्र माझा आरसा हा एक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्यात असलेले गुणदोष एक मित्र म्हणून मुले एकमेकांना सांगू लागले.

आम्ही असे घडलो.. महिन्यातून एकदा वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या मान्यवरांना शाळेमध्ये बोलावण्यात येवू लागलं.मुलं त्यांच्याशी दिलखुलास गप्पा करू लागले।आलेला पाहुणा आपली यशोगाथा मुलांच्या समोर सादर करू लागले।मान्यवरांचं ऐकून मुलांच्या मनात यशस्वी होण्याची स्वप्नं निर्माण होऊ लागले.उद्याची मोठी माणसं पेरण्याचं मोठं काम आमच्या हातून होऊ लागलं।

**चलभाषवरून मान्यवरांशी संवाद.** अभ्यासक्रमातील लेखक, कवी व इतर मान्यवरांना अभ्यासक्रमासंदर्भात मुलांना चलभाषरून बोलण्याची संधी दिली जाते.यातून मुलाचं कुतूहल बाहेर पडतं.मुलाचं संवाद कौशल्य वाढीस लागते.मुलांना शाळेची गोडी लागते।हे आम्ही जाणून होतो।म्हणून हा उपक्रम समोर आला.

आजी– आजोबा संमेलन दरवर्षी डिसेंबर महिन्यात आम्ही आजी–आजोबा संमेलन आयोजित करू लागलो.गावातील आजी आजोबा आपले बालपणीचे प्रसंग मुलांना सांगू लागले.आजी आजोबांची एकदिवसीय शाळाच भरू लागली।यातून मुलांना शाळेविषयी आपुलकी वाटू लागली.व आमचा उद्देश सफल होऊ लागला.

आईची शाळेस भेट आठवड्यातून एका मुलाच्या आईला शाळा भेटीस बोलवण्यात येऊ लागलं .आईची छोटेखानी मुलाखत होऊ लागली.मुलांना ही आई खूप काही शिकवून जाऊ लागली.शाळेच्या विकासात आईचा पण सहभाग होऊ लागला.

यासर्व उपक्रमासोबतच सहल,माझा वाढदिवस,बालकुमार मेळावे, बाल साहित्य। संमेलन आदी उपक्रमही राबविण्यात आले. यामुळे मुलांना शाळेचा लळा लागला व आम्ही यशस्वी झालो.

**(युवराज माने हे उपशिक्षक म्हणून जि.प.प्रा.शाळा पारडी ता.सेलू जि परभणी येथे कार्यरत)**

७५१७४७८५७०

# छोटासा आर्मा



डॉ.नंदा हरम
पुणे

महेश : आई,आई.... आज मला एक छोटासा प्राणी बघायला मिळालाय किती क्युट दिसतो बघ !



आकृती क्र.१ : आर्माडिलो

आई : बघू,बघू हो रे...अगदी हातावर राहिल एवढा दिसतो

महेश : हो....साधारण १३ सें.मी.लांबीचा आहे.

आई : पाठीवर कवचासारखं दिसतंय काहीतरी नाव काय रे याचं ?

महेश : पिंक फेअरी आर्माडीलो, (pink fary Armadillo)त्याला पिचिसिएगो ही (pichiciego) म्हणतात.आर्माडीलो मधील सर्वात छोटी जाती.

आई : पण बाळा...मला आठवतं त्याप्रमाणे आर्माडीलो हे त्याच्या चिलखती कवचाकरीता प्रसिध्द असतात ना?



आकृती क्र.२ : जायंट आर्माडिलो

महेश : तुझं म्हणणं,बरोबर आहे आई!ते आर्माडीलो आकारानेही मोठे असतात.सरासरी लांबी,शेपटीसह अडीच फुट तर मोठे आर्माडीलो जवळ-जवळ ५ फुट लांबीचेही असतात!

आई : बाप रे ! चांगलेच मोठे !

महेश : हो ना ! त्यांच्यापुढे हे गुलाबी आर्माडीलो अगदी पिंटुकले भासतात.

आई : हे आर्माडीलो कुठे आढळतात?

महेश : हे मध्य अर्जेंटिनाच्या सपाट वाळवंटी प्रदेशात तसेच कोरड्या गवताळ प्रदेशात आणि दक्षिण अमेरिकेच्या काही भागांत आढळतात.

आई : महेश..पण त्याचा वाळवंटात निभाव कसा लागतो?

महेश : तुझी शंका रास्त आहे आई...त्याकरीताच तो बहुतेक वेळ जमिनीखाली घालवतो.जमिनीखाली जाण्याकरीता त्याच्यात आवश्यक ते बदल झालेले आहेत

आई : म्हणजे नेमके कोणते?

महेश : त्याच्या शरीराचा आकार,पाठीवरील गुळगुळीत कवच आणि अणकुचीदार नख्या यामुळे तो वाळुमध्ये



www.shikshanyatri.com

काही सेकंदांत स्वत:ला गाडून घेतो.आणि तो बराचसा वेळ जमिनीच्या खालीच व्यतीत करतो.ज्याप्रमाणे मासा पाण्यात पोहणारा म्हणून ओळखला जातो.तसेच हा छोटासा आर्मांडिलो वाळूत पोहणारा म्हणून ओळखला जातो.अगदी सहजतेने आणि चपळतेने तो वाळुखाली वावरतो.

आई : महेश त्याच्या पाठीवरील कवचाचं काही वैशिष्टये आहे का?पिंक फेअरी...असं नाव का?

महेश : अग,खरंच ते कवच गुलाबी रंगाचं असतं,म्हणून ते नाव पडलं.त्याचं पाहिलं वर्णन १८२४ साली रिचर्ड हार्लन यांनी केलं.त्याच्या कवचात रक्तवाहिन्या असल्यामुळे गुलाबी रंग असतो.विशेष म्हणजे हे कवच शरीराला पूर्ण जोडलेलं नसतं.

आई : हा किती छोटासा प्रमाणी आहे ना?

महेश : हो ना सुरुवातीला तुला मी म्हटलं ना,साधारण १३ सें.मी लांबीचा असतो आणि वजन फक्त १२० ग्रॅम! हा निशाचर आहे.

आई : ओ...म्हणजे रात्री बाहेर पडून भक्ष्य शोधतो का?

महेश : अगदी बरोबर.तो सर्वभक्षक आहे.मुंग्या,कधी कधी गोगल गायी,वनस्पतींचे अवशेष,किडे इ. त्याच्या अन्नात समावेश असतो.मुंग्यांच्या वारुळाजवळ त्याचं वसतीस्थान असतं.

आई : त्यांच्या पुढच्या पायाच्या नख्या मजबूत आणि अणकुचीदार दिसतात नाही?

महेश : हो.....त्याचाच उपयोग ते खणण्याकरीता वापरतात.त्या नख्यांवरही कवच असतं.त्यांच्या पाठीवरचं कवच फिक्या गुलाबी रंगाचं असून त्यात एकूण २४ पट्टे असतात.आर्मांडिलोला एकूण २८ दात असतात.सगळे सारख्या आकाराचे असतात.इनॅमल नसतं.

आई : इतर आर्मांडिलोंना बाहेर दिसतील असे कान असतात,त्यांना असे कुठे दिसत नाहीत?

महेश : तुझं निरीक्षण बरोबर आहे,आई या आर्मांडिन्नोचं वैशिष्टये असं आहे आई...की यांच्या अंगावर असलेलं कवच मुख्यत्वे संरक्षणाकरीता नसून तापमान नियंत्रित करण्याकरीता असतं

महेश : त्याच्या कवचात रक्तवाहिन्या असतात,त्यात रक्त वाहिल्यामुळे कवच फिक्या गुलाबी रंगाचं दिसतं.या रक्तभिसरणामुळे शरीराचं तापमान समायोजित केलं जातं.तर आर्मांडिलो जास्त रक्त थंड हवेच्या संपर्कात आलं,तर तापमान आणखी खाली जातं.त्याविरुध्दची प्रकिया केल्यास तापमान वाढतं.पाठीवरचं कवच शरीराला पूर्णपणे जोडलेलं नसतं,तर एक पातळ पडदा पाठीच्या कण्याला जोडलेला असतो.

आई : महेश,वाळवंटात हे प्राणी राहत असल्यामुळे शरीराचं तपमान सांभाळणं त्यांना कठीण जात असेल नाही?

महेश : त्याकरीताच एक नैसर्गिक सोय त्यांच्याकडे आहे.

आई : ती कोणती?

महेश : त्यांचा चयापयाचा,वेग कमी असतो,त्यामुळे शरीराचं तापमान कमी राहतं पण औष्णिक वाहकता मात्र जास्त असते.त्यांच्यात वजनाचा दुसरा सस्तन प्राणी जर आपण विचारात घेतला तर त्यांच्यापेक्षा याच्या चयापचयाचा वेग ६० टक्क़्याहून कमी असतो.

आई : यांचं अन्न काय? हे तू मला सांगितलंस पण यांचे भक्षक कोण?

महेश : यांचे सर्वसाधारण भक्षक म्हणजे कुत्रे-मांजर आर्मी डिलोच्या पाठीवरचं कवच संरक्षणाकरीता उपयोगी नसल्यामुळे ते शक्यतो जमिनिखाली रहायचाच प्रयत्न करतात.मनुष्य हा अनेक प्रकारे त्यांचा शत्रू आहे.

आई : तो कसा काय?

महेश : अग,एवढासा जीव तो रस्ता ओलांडतांना तो वाहनाच्या खाली येतो-आणि जीव गमावून बसतो.तसेच बरेच वेळा पाळीव प्राणी म्हणून यांना माणसं घरी घेऊन जातात.पण आर्मांडिलोला हे सारं सोसत नाही.त्यांना पण असह्य होतो.आणि ९५ टक्के आर्मांडिलो आठेवु दिवसांतच गतप्राण होतात.आर्मांडिलो जमिनीखाली राहतात,पण त्यांचं बीळ फार खोल नसतं.त्यामुळे जमिनीचं शेतात किंवा कुरणात रुपांतर केलं की त्यांची बीळं उध्वस्त होतात.अशातऱ्हेने या इवल्याशा जीवांचा ऱ्हास होत आहे.

आई : बरं,एक विचाराचं होतं हे प्राणी एकत्र समूहाने राहतात.का रे ?

महेश : नाही.ते एकेकटचे राहतात.प्रजननाच्या काळात ते

एकत्र येतात.मादी फक्त एका पिलाला जन्म देते.जन्माच्या वेळी पिल्लाचं पाठीवरचं कवच मऊ असतं.पिल्लु मोठं झालं की कवच कठीण होतं
आई : हे आर्मांडिलोज साधारण किती वर्षे जगतात?
महेश : त्यांचं आयुष्य साधारण ५ ते १० वर्षांचं असतं
आई : महेश,बोलता-बोलता राहूल गेलं हा,आर्मांडिलो संक्षरणासाठी शरीराचा बॉल करु शकतो का?
महेश : थोडंसं गुंडाळतो शरीर.पण दुसरे तीन पट्टेवाले आर्मडिलोज आहेत ना,सदर्न थ्री बँडेड आर्मांडीलोआणि ब्राझिलीअन थ्री- बँडेड आर्मांडिलो






आकृती क्र.३ः ब्राझिलिअन आर्मांडिलो

मात्र शरीराचा पूर्ण बॉल करतात.
आई : त्यांना कसं शक्य होतं?
महेश : अग,त्यांच्या नावात म्हटल्याप्रमाणे कवचाचे तीन पट्टे असतात.ते अनुक्रमे त्यांचं डोकं,पाठ आणि शेपटी यांच्यावर आच्छालेद असतं याचा बाहेरचा थर केरॅटिनचा बनलेला असतो.आकृतीत दाखविल्याप्रमाणे संरक्षणाच्यावेळी अक्षरश: त्याचं बॉलमध्ये रुपांतर होत



आकृती क्र.४

आई : ओ....मस्तच एकेका प्राण्याविषयी माहिती काढायला लागलो की खरंचं आश्चर्य वाटतं नाही.चल थांबूया आता.मला वळवू दे माझा मोर्चा स्वयंपाक घराकडे.
महेश : मी ही जातो ग खेळायला आई...

९३७२९१०३०६

## संपादन

- आबा गोविंदा महाजन बालसाहित्य: आकलन आणि परिचय, संपादन-मैत्री लांजेवार, २०१६
  (मुलांनी मुलांसाठी लिहिलेली बालसाहित्य समीक्षा )
- आबा गोविंदा महाजन बालसाहित्य: आकलन आणि समीक्षा -डॉ.संगीता म्हसकर।कविता महाजन। संगीता माळी
- आबा गोविंदा महाजन यांची बालकविता :स्वरूप आणि समीक्षा (आगामी) -डॉ. किसन पाटील
- आबा गोविंदा महाजन यांचे समग्र बालसाहित्य (आगामी) -जगदीश पाटील

## पाठ्यपुस्तक / अभ्यासक्रमात समावेश

- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम.ए.(मराठी)साठी 'मन्हा मामाना गावले जाऊ' या पुस्तकाचा समावेश
- 'मन्हा गावले' या अहिराणी बालकवितासंग्रहाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,मराठी विभागाच्या अभ्यासक्रमात समावेश
- दिनूची कमाल (धडा)-इ.८वी,सुलभभारती मराठी
- मला शिकायचंय (धडा)- ४ थी, बालभारती
- पुरवणीवाचन/वाचनपाठासाठी (MCERT)-
  दोन कवितांचा समावेश
- MTS परीक्षेच्या पाठ्यपुस्तकात कवितेचा समावेश

## ब्लर्ब / प्रस्तावना लेखन

- सारिका बददे (कोपले) यांचा झिम्मड गाणी या बालकवितासंग्रहासाठी प्रस्तावना
- प्रा.रा.रं.बोराडे लिखीत 'हरवलेली शाळा' या बालकथा संग्रहासाठी ब्लर्ब लेखन
- बबन शिंदे लिखीत 'आमच्या गावात आमची शाळा' या पुस्तकासाठी ब्लर्ब लेखन
- डॉ.संगीता म्हसकर लिखित 'राजूचा रोबा' या बालनाट्यासाठी प्रस्तावना लेखन

## उपक्रम

- खानदेश स्तरीय बालसाहित्य मेळाव्याचे जळगांव येथे आयोजन
- ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी वाचनप्रेरणा अभियान राबवून पुस्तकांचे लोकसहभागाद्वारे वितरण
- 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत कथाकथन, कविता वाचन


## पुरस्कार


- भारत सरकार, साहित्य अकादमी चा बालसाहित्य पुरस्कार,२०२०
- महाराष्ट्र शासनाचा भा.रा.तांबे राज्य पुरस्कार,२००८
- महाराष्ट्र शासनाचा वा.गो.मायदेव राज्य पुरस्कार,२०१०
- महाराष्ट्र शासनाचा बालकवी राज्य पुरस्कार, २०१३-२०१४
- अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संमेलन,पुणे यांचा प्रथम प्रकाशन पुरस्कार
- महाराष्ट्र साहित्य परिषदेचा वि.वि.बोकील पुरस्कार
- अ.भा.मराठी बालकुमार संस्था कोल्हापूर,यांचा बालवाङ्.मय पुरस्कार
- बापूसाहेब ढाकरे बालवाङ्.मय पुरस्कार
- अ.भा.मराठी प्रकाशक संघाचा बालसाहित्य प्रथम पुरस्कार
- अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संमेलन यांचा उत्कृष्ट कथेचा पुरस्कार
- अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संमेलन यांचा उत्कृष्ट कवितेचा पुरस्कार
- शशिकलाबाई आगाशे उत्कृष्ट बालवाङ्.मय पुरस्कार, २०१५
- बालसाहित्याच्या योगदानासाठी मसाप शाखा जुळे सोलापूर यांचा बालसाहित्य पुरस्कार,२०१८
- यशवंत दाते स्मृती संस्था वर्धा यांचा बालसाहित्य पुरस्कार, २०१८
- बालसाहित्याच्या योगदानासाठी मातोश्री स्नेहप्रभा तौर बालसाहित्य पुरस्कार,२०१८
- कविवर्य ए.पां.रेंदाळकर वाचनालयाचा बालसाहित्य पुरस्कार २०१९


Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23


# आबा महाजन यांची बेस्ट सेलर पुस्तके

































Postal Registration No.DHL/557/2021-23

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ................................................
................................................
................................................

Pragati Arts Shirpur 8421356261